POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-७३ ● मुंबई, बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

- जळगावमध्ये शिंदे सेनेचा वरचष्मा
- नाशिकमध्ये भाजपचा स्वबळाचा नारा?
- धाराशिवमध्ये सुद्धा भाजपचे एकला चलो रे
- रायगडमध्ये सेना-राष्ट्रवादी एकत्र
- गडचिरोलीत राष्ट्रवादीचा स्वबळाचा नारा
- नंदुरबारमध्ये भाजपने शड्डू ठोकले



## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकला चलो रे!

### काही ठिकाणी आघाडी, तर कुठे युती, निवडणुकीसाठी सर्वच पक्षांची मोर्चे बांधणी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल पुढील महिन्याच्या अखेरीस वाजण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मिनी मंत्रालयासह महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुकांचा नारळ पुढील महिन्यात फुटण्याची दाट शक्यता आहे. यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाला या निवडणुकीविषयी सुप्रीम फटकारे बसले आहेत. दरम्यान राज्यात स्वबळाचे नारे उंचावल्याचे एकंदरीत चित्र आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचा धर्म स्थानिक पातळीवर पाळल्याच जाईल असे वाटत नाही. अनके ठिकाणी स्थानिक नेत्यांनी युती आणि आघाडीऐवजी एकला चलो रेचा नारा दिला आहे. तर काही ठिकाणी त्यांनी युती, आघाडीची तयारी सुरू केली आहे. राज्यातील काही ठिकाणची ही वानगी दाखल उदाहरणं स्थानिक पातळीवरील राजकीय घडामोडींची नांदी दाखवत आहेत.

**विरोधकांशी युती कशी करू?**

सर्वांनी एकत्र येऊन किशोर पाटीलला थांबवायचा प्रयोग केला आहे. मात्र पाचोरा भडगाव मतदार संघातील जनता आणि शिवसैनिक माज्या पाठीशी खंबीर उभे आहे. बुथप्रमुखांच्या मेळाव्यात मी घोषणा केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पाचोरा, भडगाव मतदार संघात शिवसेना स्वबळावर लढेल.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या स्टेटमेंट बघितले तर ज्या ज्या मतदार संघामध्ये जशी परिस्थिती आहे त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. माझ्या मतदारसंघातील भारतीय जनता पक्ष जर उद्या माझी खाट टाकणार असेल, जे माझ्या विरोधात लढले ते सर्व विरोधक एक केले. मी त्यांच्यासोबत कसे लढायचे? सर्व माझ्या विरोधात लढले मी त्यांच्याशी युती कशी करू. सर्व जरी एकत्र आले तरी दूधच दूध आणि पाणीच पाणी होईल.

**रेखा मालचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार**

पाचोरा भडगाव मतदार संघातील दोघेही नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १००% जागांवर शिवसेनेचा भगवा फडकेल. भडगाव नगरपालिकेची महिला एसटी प्रवर्गाची जागा निघाली आहे, त्या जागेवर मी उमेदवारी घोषीत केली आहे. रेखा प्रदीप मालचे यांना मी भडगाव नगरपालिकेची लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली आहे.

पाचोरा नगरपालिकेचा विषय मी कार्यकर्त्यांवर सोडला आहे. अर्ध्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की माझ्या पत्नीला द्यावे तर अर्ध्यांचं म्हणणं आहे माझ्या मुलीला उमेदवारी द्यावी. एक नोव्हेंबरला माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मी निर्धार मेळावा ठेवला आहे. त्या दिवशी ही उमेदवारी जाहीर करेल, असे आमदार किशोर पाटील यांनी जाहीर केले आहे.

---

### एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला धक्का देत भाजपा-राष्ट्रवादीची युती

## निवडणुकीच्या तोंडावर महायुतीत बिघाडी!

बदलापुरात भाजप आणि राष्ट्रवादीने युती जाहिर करत शिवसेनेला एकाकी पाडलंय.शिवसेनेनं स्वबळाचा नारा देत स्वबळावर नगराध्यक्ष बसवण्याचा निर्धार केलाय.निवडणुका अजून जाहिर झालेल्या नाहीत त्यातच बदलापुरात महायुतीत बिघाडी झालीय.. यामुळे बदलापुरातील निवडणुकीचं समीकरण बदलणार आहे.. बदलापूरात भाजप-राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना असाच प्रमुख सामना रंगणाराय.




**■मुंबई। प्रतिनिधी,**

आगामी नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर बदलापुरात महायुतीत बिघाडी झालीय. बदलापूरात शिंदेंच्या शिवसेनेला धक्का देत भाजप आणि राष्ट्रवादीने युती केलीय. त्यामुळे शिंदेंची शिवसेना बदलापुरात एकाकी पडल्याचं चित्र आहे.त्यामुळे नगरपरिषद निवडणुकीत बदलापुरात भाजप-राष्ट्रवादी युती विरुद्ध शिवसेना यांच्यामध्ये मुख्य लढत होण्याची शक्यताय. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जोरदार रणधुमाळी सुरू आहे. त्यातच बदलापुरात महायुतीमध्ये बिघाडी झाल्याचं पाहायला मिळतंय. राज्यात महायुतीचं सरकार असलं तरी बदलापुरात च भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने युती करत शिंदेंच्या शिवसेनेला जोरदार धक्का दिलाय. या युतीमुळे शिंदे गट एकाकी पडल्याचं चित्र आहे. कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन बदलापूरच्या विकासासाठी ही युती केल्याचं भाजप आमदार किसन कथोरे यांनी दिलीय. एकीकडे भाजप आणि राष्ट्रवादीच्या युतीची घोषणी करण्यात आलीय. मात्र राज्यात एकत्र आहोत त्यामुळे बदलापुरातही शिवसेनेला सोबत घेण्यासाठी प्रयत्नशील आहोत असं म्हणत राष्ट्रवादीचे नेते आशिष दामले यांनी सावध भूमिका घेतलीय. भाजप आणि राष्ट्रवादीच्या युतीमुळे एकाकी पडलेल्या शिवसेनेत संतापाची लाट पसरलीय... आम्हाला विश्वासात न घेता ही युती करण्यात आल्याचं शिवसेना शहर प्रमुख वामन म्हात्रे यांनी म्हटलंय. मात्र असं असलं तरी शिवसेना स्वबळावर निवडणूक लढवून सत्ता मिळवू असा विश्वास वामन म्हात्रे यांनी व्यक्त केलाय.




राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाचे पडघम वाजू लागलेयत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय धुराळा उडाल्याचं पाहायला मिळतंय. मविआसोबत मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांची भेट घेतली. दरम्यान यावेळी या शिष्टमंडळानं निवडणूक आयोगाला काही सवाल केलेत. विधानसभा निवडणुकीनंतर निवडणूक आयोगाच्या कारभारावर विरोधकांनी बोट ठेवलंय. तसंच निवडणूक आयोगाला निवदेन देत विरोधकांनी जाबही विचारला.

- मविआ निवडणूक आयोगाला कोणते सवाल विचारले?
- निवडणूक आयोगाच्या कारभाराबद्दल सामान्यांच्या मनात शंका, तसंच निवडणूक आयोग स्वायत्त आहे का? अशीही शंका
- लोकसभा, विधानसभेला किती मतदार वगळले त्याचा तपशील का मिळत नाही?
- एखाद्या व्यक्तीचं नाव का काढलं गेलं ते त्याला का सांगितलं जात नाही? त्याचं नावं, त्याचा पूर्ण तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करावा
- २०२४ची विधानसभा निवडणूक झाल्यानंतर जी नवीन नावं यादीत समाविष्ट झालीत त्यांची यादी अजूनही प्रसिद्ध का नाही?
- यादी लपवण्यात राजकीय हेतू आहे का? मतदार यादीवर अभ्यास करणे हा प्रत्येक राजकीय पक्षाचा अधिकार
- मतदार यादी लपवण्यात काही राजकीय छुपे हेतू आहेत, की कोणाचा दबाव आहे?
- आयोगाने स्वायत्तता दाखवली नाही तर कोण दाखवणार?
- महापालिका निवडणुकांसाठी व्हीव्हीपॅट वापरले जाणार नाही असं निवडणूक आयोगाने सांगितलं, असं का?

---

## पालघरमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर आदिवासींचा महामोर्चा

**■पालघर। प्रतिनिधी,**

अनुसूचित जमातीच्या आरक्षणात बंजारा आणि धनगर समाजाला समाविष्ट करण्याच्या मागणीविरोधात मंगळवार (१४ सप्टेंबर) जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये जिल्हाभरातील आदिवासी बांधवांनी सहभाग नोंदवला. सकाळपासूनच क्रांतीवीर बिरसा मुंडा चौक, पालघर चार रस्ता परिसरात आदिवासी बांधव, महिला, तरुण, विद्यार्थी आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते जमू लागले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि घोषणा देत मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघाला. बंजारा-धनगर हटाओ, आदिवासी आरक्षण बचाओ!, हम हमारा हक मांगते, किसीसे भिख नहीं मांगते!, आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे!, बिरसा मुंडा करे ऊलगुलान - ऊलगुलान! अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

मोर्चाच्या शेवटी जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात बंजारा आणि धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्याच्या मागणीचा निषेध नोंदवण्यात आला. हे पाऊल संविधानविरोधी असून आदिवासी समाजाच्या हक्कांवर आघात करणारे आहे, असे स्पष्ट शब्दांत नमूद करण्यात आले. मोचानंतर झालेल्या सभेत बोईसरचे आमदार विलास तरे यांच्यासह विविध आदिवासी नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांचे प्रतिनिधी यांनी भाषण केले.




**आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीच्या प्रमुख मागण्या**

१) बंजारा व धनगर समाजाचा अनुसूचित जमाती मध्ये समावेश करू नये.

२) आदिवासी ते बिगर आदिवासी जमीन हस्तांतरणास विरोध.

३) बोगस आदिवासींना मिळालेले अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र त्वरीत रद्द करण्यात यावे.

४) पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी त्वरीत करावी.

५) जिल्हा परिषेदेच्या सभागृहाला निसर्गवासी काळुराम काकड्या धोदडे (काका) यांचे नाव देण्यात यावे.

दरम्यान आमदार तरे म्हणाले की, आरक्षण हा आमचा संविधानात दिलेला हक्क आहे. बंजारा आणि धनगर समाजाची अनुसूचित जमातीत समावेशाची मागणी ही पूर्णपणे असंवैधानिक आहे. आमच्या आरक्षणावर कुणाचाही डाका चालणार नाही. सरकारने या घुसखोरीच्या हालचालींना तात्काळ आळा घालावा. तसेच, आदिवासी समाजाचा संघर्ष केवळ आरक्षणापुरता नाही, तर आपली ओळख, संस्कृती आणि अस्तित्व यासाठी आहे. 'संविधानाचा सन्मान करा, आदिवासींचा अधिकार राखा' हेच या आंदोलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. असे आमदार तरे यांनी सांगितले. तसेच, वेळ असल्यास आम्ही आमच्या जातीची राजीनामा देखील देऊ. सभेत इतर वक्त्यांनीही आदिवासी संस्कृती टिकवा तरच आरक्षण टिकेल! असा संदेश देत समाजाला एकतेचे आवाहन केले.

याप्रसंगी आदिवासी आरक्षण बचाव कृती समिती, जिल्हा पालघर अध्यक्ष आमदार विलास तरे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार हरिश्चंद्र भोये, माजी खासदार बळीराम जाधव, वैदही वाढाण, जगदीश धोडी, रमेश सवरा, ॲड. विराज गडग, संतोष बुकले, अशोक शिंगाडा, प्रसाद पहाड, प्रतिभा गुरोडा, डॉ. सुनील पहाड, दत्ताराम करबट, किर्ती वरठा, ॲड. मीना धोदडे आणि आदिवासी समाज उपस्थित होता.

---

## पुण्यातील सॅलीसबरी पार्कमध्ये ईडीची धाड... महाराष्ट्रातील दोन मोठ्या काँट्रॅक्टरची चौकशी

**वसई-विरार मनपा क्षेत्रातील बांधकाम घोटाळ्याप्रकरणी ईडीने माजी आयुक्तांविरोधात दोषारोपपत्र दाखल**

वसई-विरार मनपा क्षेत्रातील बांधकाम घोटाळ्याप्रकरणी ईडीने माजी आयुक्तांविरोधात दोषारोपपत्र दाखल केले. अनिलकुमार पवार यांच्यासह १८ भूमाफिया आणि अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयात ३४१ पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. आरोपपत्रातून अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. ईडीच्या आरोपपत्रानुसार, आयुक्त पदावर असताना अनिलकुमार पवार यांनी प्रत्येक कामासाठी मोठी लाच घेतली आणि भ्रष्टाचारासाठी एक यंत्रणा उभी केली होती. ४१ हून अधिक अनधिकृत इमारतींकडे डोळेझाक करण्यासाठी आणि त्यांना परवानगी देण्यासाठी पवार यांनी कोट्यवधी रुपये लाच घेतल्याचा ठपका ठेवला आहे. या लाचेच्या पैशातून पवारांनी लक्झरी कार, महागड्या साड्या आणि सोन्या-हिऱ्यांचे दागिने खरेदी करून मोठी उधळपट्टी केल्याचेही तपासात समोर आले आहे.



**■पुणे। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रातील दोन मोठ्या कॉंट्रॅक्टरवर ईडीने धाड टाकली आहे. पुण्यातील सॉलीसबारी पार्कमध्ये ईडीने छापेमारी केली आहे. या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे. ही करावाई का करण्यात आली तसेच छापेमारीत काय सापडले याची कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही. विजय धवांगळे त्यांचे भाऊ अजय धवांगळे आणि विवेक बाळासाहेब गव्हाणे या ठेकेदारांवर छापेमारी करण्यात आली.

विवेक गव्हाणे यांच्या पुण्यातील सॅलीसबरी पार्क येथील घरी आणि मार्केट यार्ड मधील ऑफीसवर आयकर विभागाने छापेमारी केली. धवांगळे बंधुच्या नागपुर आणि मुंबईतील घरे आणि कार्यालयांवर छापेमारी केली. धवांगळे बंधुच्या एस टु इन्फोटेक, वंश इन्फोटेक, लक्सर रियालिटी, वन ग्लोबल सर्विसेस अशा शेकडो कंपन्या आहेत. गव्हाणे आणि धवांगळे राज्य सरकारमधील बडे कॉन्ट्रॅक्टर आणि पुरवठादार धवांगळे आणि गव्हाणे यांच्यावरील छाप्यांमुळे खळबळ उडाली आहे. याआधी विवेक गव्हाणे आणि त्यांच्या आशिष ट्रेडर्स कंपनीवर ईडीकडुनही कारवाई करण्यात आली.

---

## ऐश्वर्या ऑर्केस्ट्रा बारवर छापा

### काशिमीरा गुन्हे शाखेची मोठी धडक!

**■मिरारोड। प्रतिनिधी,**

मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील ऐश्वर्या ऑर्केस्ट्रा बार वर गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-१, काशिमीरा यांची कारवाई. अधिक माहितीनुसार मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील ऐश्वर्या ऑर्केस्ट्रा बार अँड रेस्टॉरंटमध्ये नियम डावलून गाणी गाण्याच्या बहाण्याने महिलांना अश्लिल नृत्य करण्यास भाग पाडले जात असल्याबाबत गुन्हे प्रकटिकरण शाखा, कक्ष-१, काशिमीरा यांना माहिती मिळाली होती.

सदर बातमीची शहानिशा करण्यासाठी दिनांक ११/१०/२०२५ रोजी मध्यरात्री सदर बार वर छापा टाकला असता सदर ठिकाणी ७ मुली या हिंदी गाण्यांवर नृत्य व अश्लिल नृत्य करताना आढळून आल्या. तसेच, काही मुली या बारमधील मेकअप रूमच्या शेजारील बोळामधून बाहेर पळून जात असल्याचे समजल्याने पाहणी केली असता ३ मुली या पळून जाताना मिळून आल्या.

सदर वेळी, बारमध्ये एकूण ३० ग्राहक होते.अशाप्रकारे, ऐश्वर्या ऑर्केस्ट्रा बार अँड रेस्टॉरंटचे चालक निकुंज रात्रा, मालक, मॅनेजर, वेटर्स यांनी आपसांत संगनमत करून बारमधील मुलींना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडून प्रोत्साहित केले तसेच, नियमापेक्षा जास्त मुली ठेवून कायदेशीर आदेशाचा भंग केला म्हणून वर नमूद एकूण १० आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त सो., मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो., मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो., प्रकटीकरण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा येथील प्रभारी पोनि. सुशिलकुमार शिंदे, पोउपनिरी / उमेश भागवत, सफौ/पुष्पेंद्र थापा, अशोक पाटील, अविनाश गर्जे, पो.हवा/ सचिन हुले, सुधीर खोत, पोशि धीरज मेंगाणे व मसुब किरण आसवले यांनी केली आहे.

---

### लाओसमध्ये सायबर गुलामगिरीसाठी तरुणांची तस्करी

## गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई यशस्वी!

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

भारतीय तरुणांना लाओस या देशात सायबर गुलामगिरी करीता पाठविणाऱ्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पदार्पाश करण्यात गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश. अधिकमाहितीनुसार मिरा-भाईंदर शहरातील काही एजंटनी मिळून लाओस येथे ऑनलाईन कॉल सेंटरमध्ये चांगल्या पगाराची नोकरीवर लावण्याचे आमिष दाखवून इसम इस्माईल इब्राहीम सय्यद यास थायलंड मार्गे अवैधरीत्या लाओस येथे पाठविले असल्याबाबत गोपनिय बातमीदारामार्फत गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष १ यांना माहिती मिळाली होती.

त्यावरून, मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ यातील पीडित इसम ईस्माईल इब्राहिम सय्यद यांच्याशी संपर्क साधून त्यांना विश्वासात घेवून अधिक चौकशी केली असता असता, त्यांनी नयानगर परिसरात रहाणारे आरोपी समीर शेख व आमीर खान तसेच, सागर गौतम मोहीते ऊर्फ ॲलेक्स ऊर्फ क्रिस, रा. काशिमीरा यांनी आपसांत संगनमत करून स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी पीडित ईस्माईल इब्राहिम सय्यद तसेच, शाबान अली, रा. नयानगर व लकी अली, रा. गुजरात यांना त्यांची पिळवणूक करण्याच्या इरादयाने मुंबई येथून थायलंड मार्गे अवैधरीत्या लाओस या देशात पाठवून मानवी तस्करी केली. त्यानंतर, लाओस या देशातील सायबर फ्रॉड करणाया कंपनीमध्ये चायसन या चिनी वंशाच्या इसमाने त्यांची भरती करून त्यांना भारतीय मुलींच्या नावाने फेसबुकवर खाते उघडून परदेशातील भारतीय लोकांशी फ्रेंडशिप करुन त्यांना विश्वसात घेवुन त्यांना पैसे इन्व्हेस्ट करायला सांगून त्यांची फसवणूक करण्याचे काम करण्याबाबत प्रशिक्षण दिले. तसेच, पीडित इसमांनी सदर काम करण्यास नकार दिला असता त्यांचे पासपोर्ट फाडण्याची, तसेच, त्यांना मारून टाकण्याची भिती घालून त्यांना सदर इमारतीच्या बाहेर जाण्यास अटकाव केला आहे. अशा फियार्दी यांनी दिलेलया तक्रारीवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे वर नमूद ३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष १ यांनी यातील एजंट नामे आमिर सोहेल नईम एहमद यास नयानगर येथून अटक करण्यत आली असून इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

सदरची कामगिरी मा. श्री निकेत कौशिक, पोलीस आयुक्त सो़, मा. श्री दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो़, मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो , प्रकटीकरण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष १, काशिमीरा येथील प्रभारी पोनि. सुशिलकुमार शिंदे, पोउपनि/ उमेश भागवत, सफौ/अशोक पाटील, संजय शिंदे, पुष्पेंद्र थापा, अविनाश गर्जे, पो.हवा./मनोज चव्हाण, सचिन हुले, सुधीर खोत, स्वप्नील मोहीले, प्रशांत विसपुते, पो.अं./धिरज मेंगाने यांनी केली आहे.

---


### महिला आमदाराला अश्लील व्हिडीओ आणि फोटो पाठवायची...

## पोलीसांचा तपासात मोठा खुलासा

**■ठाणे। प्रतिनिधी,**

समाज माध्यमांवरुन एका आमदाराला अश्लील छायाचित्रे आणि व्हिडीओ पाठवत आमदराकडे पैशाची मागणी करणारी 'ती' नव्हे तर 'तो' असल्याची बाब पोलिसांच्या तपासात समोर आली आहे. या प्रकरणी चितळसर पोलिसांनी या आमदाराच्या मतदारसंघातील कोल्हापूरच्या एका उच्चशिक्षित तरुणाला अटक केली आहे. हा तरुण बेरोजगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यातील एका मतदारसंघाचे आमदार असलेले तक्रारदार ठाण्यात राहतात. गेल्यावर्षी मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना त्यांना सातत्याने अनोळखी नंबरवरुन फोन येऊ लागले. वैतागून त्यांनी फोन घेतल्यानंतर समोरुन बोलणाऱ्या महिलेने ती त्यांना ओळखत असून मैत्री करायचे असल्याचे सांगितले.

ही महिला आपणाला फसवणूकीच्या जाळ्यात ओढळण्याच्या शक्यतेवरुन या आमदारांनी महिलेचा मोबाइल नंबर ब्लॉक केला. पुढे ते




विधानसभा निवडणूकीमध्ये व्यस्त झाले. पण त्यांना दुसऱ्या एका अनोळखी नंबरवरुन पुन्हा व्हॉट्सॲपवरुन महिलेचे फोन आणि मेसेज येऊ लागले. नंतर ती त्यांच्याशी अश्लील चॅट करु लागली. तिने अश्लील छायाचित्रे आणि व्हिडीओ पाठवत आमदाराकडे ५ ते १० लाखांची मागणी केली. या आमदाराच्या तक्रारीनंतर संबधित महिलेविरुद्ध चितळसर पोलीस ठाण्यात गेल्या आठवड्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. थेट आमदाराकडे पैशाची मागणी करण्यात आल्याने खळबळ उडाली होती. पोलिसांनी तात्काळ तपास चालू केला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल वरुडे यांच्या अधिपत्याखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल शिरोळे तसेच सायबर पथकातील कर्मचाऱ्यांनी दोन मोबाइल क्रमाकांचे सीडीआर काढले. तांत्रिक तपास करत आमदाराकडे पैशाची मागणी करणारी कोणी महिला नसल्याचे तर तरुण असल्याची बाब पुढे आली. मुळचा कोल्हापूरचा असलेल्या मोहन पवार या २६ वर्षाच्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याने हा प्रकार केल्याची बाब स्पष्ट झाली. मोहनला पोलिसांनी अटक केली असून तो या आमदाराच्या मतदारसंघातील राहणारा असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**काम मिळावे यासाठी आमदाराची भेट**

'बीएस्सी'पर्यंत शिक्षण घेतलेला मोहन बरोजगार असून त्याचे आई-वडील शेती करतात. काम मिळावे यासाठी त्याने संबधित आमदाराची एकदा भेट घेतली होती, अशी माहिती एपीआय शिरोळे यांनी दिली. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीने फोन बंद केला होता. मात्र, नंतर पुन्हा चालू केला. आणि तो पकडला गेल्याचे शिरोळे यांनी सांगितले.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## शेतकऱ्यांचे 'देवाभाऊ'



**सप्टेंबरमधील अतिवृष्टी आणि महापुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने मदतीचा हात दिला. ३२ हजार कोटींच्या ऐतिहासिक पॅकेजमधून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत जमा होणार आहे.**

सप्टेंबर महिन्यात राज्याच्या काही भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. सोयाबीनसारखी हाताशी आलेली नगदी पिके अतिवृष्टीमुळे, महापुरामुळे भुईसपाट झाली. गाई-म्हशी यांसारखी शेतकऱ्यांना जोडधंद्याचा आधार देणारी जनावरे महापुरात वाहून गेली. अचानक आलेल्या महापुरामुळे घरात पाणी शिरून हजारो लोकांचे संसार वाहून गेले. हजारो शेतकऱ्यांची जमीन अक्षरशः खरवडून निघाली. या अस्मानी संकटामुळे राज्यातील शेतकरी हतबल झाला. मोठ्या कष्टाने घेतलेली पिके नष्ट झाल्यामुळे 'उद्या खायचे काय', असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला. संकटात सापडलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीचा आधार दिसत होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना तत्काळ मदत म्हणून २२०० कोटींचा निधी तातडीने वितरीत केला. केंद्र सरकारकडे नुकसानीची माहिती घेऊन मदतीसाठी प्रस्ताव सादर करण्याची विशिष्ट प्रक्रिया असते. ही प्रक्रिया पूर्ण करेपर्यंत बराच वेळ लागला असता. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने सुमारे ३२ हजार कोटींचे मदतीचे पॅकेज जाहीर केले. अनेक अर्थाने शेतकऱ्यांना जाहीर केलेली ही मदत ऐतिहासिक आहे. देशात आजवर कोणत्याच सरकारने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना एवढी मदत दिली नव्हती. राज्य सरकारची मदत कोणत्याही परिस्थितीत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, या दृष्टीने देवेंद्र फडणवीस यांनी नियोजन केले आहे. हे मदत पॅकेज जाहीर करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचा विविध अंगांनी बारकाईने विचार केला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर प्रथमच शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि महापुराच्या रौद्र आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे. अतिवृष्टी आणि महापुरामुळे ६८ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुक्यांतील शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि महापुराचा फटका बसला आहे. शेतजमीन वाहून जाणे, घरादारात पाणी शिरून संपूर्ण संसार वाहून जाणे अशा पद्धतीचे संकट महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी प्रथमच अनुभवले आहे. या संकटाची व्यापकता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदतीचे पॅकेज तयार केले आहे. त्यामुळेच राज्यातील शेतकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस हे खऱ्या अर्थाने 'देवाभाऊ' ठरले आहेत, असे म्हणण्याशिवाय तरणोपाय नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या २०१४ पासूनच्या मुख्यमंत्रीपदावरील कारकीर्दीचा आढावा घेतला असता फडणवीस हे राज्यातील बळीराजाचे तारणहार असल्याचे सिद्ध झाले आहे. राज्य सरकारच्या पॅकेजअंतर्गत कोरडवाहू, बागायती आणि फळबागा असलेल्या जमिनींच्या नुकसानीपोटी वेगवेगळ्या प्रमाणात थेट आर्थिक मदत दिली जाणार आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना १८ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे मदत केली जाणार आहे. हंगामी बागायती पिकांना हेक्टरी २७ हजार ५०० रुपये, तर बागायती शेतकऱ्यांना ३२ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे अर्थसहाय्य केले जाणार आहे. हे अर्थसहाय्य शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. यामुळे त्यासाठी शेतकऱ्यांना सरकारी अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या दारापुढे जाण्याची आवश्यकता नाही. ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला आहे अशा शेतकऱ्यांना तसेच पूर्ण नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणखी १७ हजार रुपयांची अतिरिक्त मदत केली जाणार असल्याचे फडणवीस सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याचा अर्थ फडणवीस सरकारकडून कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ३५ हजार रुपये, तर बागायतदार शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपये एवढी मदत केली जाणार आहे. शेती नुकसानीसाठी १८ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारने जाहीर केला आहे. अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे जमीनच वाहून गेल्याचे प्रकार घडले आहेत. ज्यांची जमीन खरवडून गेली आहे अशा शेतकऱ्यांना ४७ हजार रुपये प्रति हेक्टर या प्रमाणात मदत केली जाणार आहे. त्याचबरोबर मनरेगा योजनेच्या माध्यमातून जमीन खरवडून गेलेल्या शेतकऱ्यांना तीन लाख रुपये प्रति हेक्टर अतिरिक्त मदत दिली जाणार आहे. अतिवृष्टी आणि महापुरामुळे अनेकांच्या विहिरी गाडल्या गेल्या आहेत. अशा शेतकऱ्यांना गाडलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये मदत केली जाणार आहे. महापुरामुळे रस्ते, पूल, विजेचे खांब यासारख्या पायाभूत सुविधांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीकरिता १० हजार कोटींचा निधी जाहीर करण्यात आला आहे. वाहून गेलेल्या दुभत्या जनावरांसाठी ३७ हजार ५०० रुपये प्रति जनावर, ओढकाम करणाऱ्या जनावरांसाठी ३२ हजार रुपये प्रति जनावर, कुक्कुट पालनाचा जोडव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति कोंबडी १०० रुपये या पद्धतीने मदत केली जाणार आहे. महापुरामुळे अनेकांच्या घरांची पडझड झाली. काही ठिकाणी घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. अशी घरे केंद्र सरकारच्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत नव्याने बांधली जाणार आहेत. फळबागायतदारांना हेक्टरी २७ हजार रुपयेप्रमाणे मदत केली जाणार आहे. महापुरामुळे नुकसान झालेल्या दुकानदारांना ५० हजार रुपये एवढे अर्थसहाय्य केले जाणार आहे. दुष्काळ आणि टंचाईस्थितीमध्ये सरकारकडून ज्या सवलती दिल्या जातात त्या सर्व सवलती या संकटातही दिल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी, वीज पंपांच्या नुकसानीसाठी मदत, या पद्धतीचे निर्णयही फडणवीस सरकारने जाहीर केले आहेत. नैसर्गिक संकटाच्या काळात ६५ मिलिमीटर एवढा पाऊस झाला असेल, तरच सरकारकडून अर्थसहाय्य केले जाते. ही अटही फडणवीस सरकारने यावेळी काढून टाकली आहे. शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक आणि मानसिक त्रासाची संपूर्ण भरपाई कोणतेच सरकार करू शकत नाही. तरीही देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या माध्यमातून अधिकाधिक मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस हे राज्यातील बळीराजासाठी खऱ्या अर्थाने 'देवाभाऊ' ठरले आहेत. २०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली होती. त्या कर्जमाफीचा फायदा गरजू शेतकऱ्यांना झाला होता. यावेळच्या संकटामुळे विरोधकांना फडणवीस सरकारवर टीका करण्यासाठी मोठे निमित्त मिळाले होते; मात्र फडणवीस सरकारने जाहीर केलेली ऐतिहासिक मदत पाहून विरोधकांची वाचा बसली आहे. कारण त्यांच्या अपेक्षेपेक्षाही मोठी मदत फडणवीस सरकारने केली आहे.

## शिक्षण हक्काचा प्रश्न आणि शिक्षण हक्क कायदा

**शिक्षण हक्क कायदा २००९ : स्वातंत्र्यानंतर ६२ वर्षांनी, अनिच्छेने बनवलेला हा कायदा खासगीकरण, स्तरीकरण आणि समान शाळा पद्धतीचा नकार देऊन शिक्षण हक्क नाकारणारा ठरला. सरकारी शिक्षण व्यवस्था डबघाईस आली आणि स्तरीकरण कायम राहिले. परिणामी, आज शाळा वाऱ्यावर आहेत.**



गेले काही महिने आपण शिक्षण हक्काच्या प्रश्नाची चर्चा वेगवेगळ्या संदर्भात करत आहोत. भारताच्या वर्णजाती समाजात शिक्षण हक्काचा प्रश्न किती जटिल आणि बहुस्तरीय आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न आपण केला. मनुस्मृतीच्या दंडकाप्रमाणे शिक्षण हक्क नाकारण्याचा कायदा अस्तित्वात आला. वर्णव्यवस्थेचे दंडविधान मनुस्मृतीने घडवले. वर्णव्यवस्था जन्मली, घडली, रुजली व लोकांच्या जगण्याचा भाग बनली. त्यामुळे मनूचा कायदा प्रभावीपणे अंमलात आला. मनुस्मृतीला नाकारणारा विचार आणि कायदा अस्तित्वात आला, तरीही मनुस्मृतीचा प्रभाव आजही कायम आहे. व्यवस्था समर्थनाचा कायदा स्पष्टपणे व्यवस्था समर्थनाची भूमिका घेतो व त्याची अंमलबजावणी प्रभावी होते. व्यवस्थेला आव्हान उभे करणारे कायदे सत्ताधाऱ्यांना नको असतात. अपरिहार्यता म्हणून कायदे करावे लागले, तर सुधारवादी किंवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष व्यवस्थेच्या समर्थनात कायदे तयार केले जातात. अपवादात्मक कायद्यातून पीडित जनतेला संरक्षण मिळत असले, तरी अंमलबजावणीचे प्रश्न कायम असतात.

शिक्षण हक्काचा प्रश्न समर्थन-विरोधाच्या चौकटीत काम करत राहिला आहे. १ एप्रिल २००९ ला शिक्षण हक्क कायदा संसदेने मंजूर केला व १ एप्रिल २०१० पासून अंमलबजावणीला सुरुवात झाली. या कायद्याला राजकीय, सामाजिक व न्याय व्यवस्थेची पार्श्वभूमी होती. अवार्चीन काळात जोतीराव फुलेंनी हंटर कमिशनला निवेदन देऊन विनामूल्य व सक्तीच्या शिक्षणाची मागणी केली. हा अवार्चीन काळातील पहिला प्रयत्न होता. हंटर कमिशनने कायदा केला, परंतु शिक्षण हक्काचा कायदा केला नाही. १९११ मध्ये गोपाळकृष्ण गोखलेंनी इम्पिरिअल कौन्सिलमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी विधेयक मांडले. बहुमताअभावी हे बिल फेटाळण्यात आले. त्यानंतर शाहू महाराजांनी १९१७ मध्ये ७ ते १४ वयातील मुलांसाठी शिक्षण हक्क कायदा केला. शाहू महाराजांच्या कायद्यानंतर ९२ वर्षांनी आणि स्वातंत्र्याच्या ६२ वर्षांनी शिक्षण हक्क कायदा २००९ संसदेने मंजूर केला. प्राथमिक शिक्षणाचा कायदा होण्यासाठी एवढा प्रदीर्घ काळ लागला. कायदा करणे संसदेला टाळता येत नव्हते, म्हणून शिक्षण हक्क कायदा २००९ करण्यात आला. अनिच्छेने केलेल्या कायद्याची संहिता व्यवस्था समर्थनाची बनवली गेली. अनिल सदगोपाल या कायद्याला 'शिक्षा का अधिकार छीनने वाला कानून' म्हणतात. हा कायदा खासगीकरणाचे कायदेशीर समर्थन करतो, स्तरीकरणाला संमती देतो, समान शाळा पद्धतीला नाकारतो, राज्याला कायद्यात हस्तक्षेप करण्याची तरतूद करतो आणि ० ते ६ वयाच्या मुलांचा हक्क नाकारतो.

१९९३ ला सुप्रीम कोर्टाचा उन्नीकृष्णन निकाल जाहीर झाला. राज्यघटनेच्या ४५व्या कलमाचा आधार घेऊन सुप्रीम कोर्टाने हा निकाल दिला. या निकालाने ०-१४ वयापर्यंतच्या मुलांचा शिक्षण हक्क संरक्षित केला होता. उन्नीकृष्णन निकाल सत्ताधाऱ्यांना स्वीकारायचा नव्हता, म्हणून २००१ ला ८६ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. ८६ व्या घटनादुरुस्तीने ० ते ६ वयातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्कातून वगळले व ६ ते १४ वयातील मुलांचा कायद्यात समावेश केला. २००९ मध्ये भारतात ० ते ६ वर्षांची १७ कोटी मुले होती. ० ते १४ वर्षांपर्यंत हक्क देणारा कायदाही अपूर्णच राहिला असता. जगभर ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचा शोध लागत असताना किमान १२वीपर्यंत हा हक्क देणे गरजेचे होते. उच्च शिक्षणातील ज्ञान व्यवहारात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाल्याशिवाय शिक्षणाचा हक्क प्रस्थापित होत नाही, ज्याची हमी कायद्याने नाकारली. या कायद्यात अनेक चलाख्या करून शिक्षण हक्क देत असल्याचा आभास निर्माण केला.

२००९ पूर्वी शिक्षणात खासगीकरण अस्तित्वात आले होते, परंतु खासगीकरणाला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले नव्हते. या कायद्याने खासगी शाळेत दुर्बळ व वंचित घटकांसाठी २५ टक्के आरक्षणाची तरतूद करून खासगीकरणाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. 'दुर्बळ व वंचित' शब्दाचा वापर शोषणाचे कारण व तीव्रता दडवण्यासाठी केला जातो. या कायद्यानेही तेच केले. २५ टक्के आरक्षणातून सत्ताधाऱ्यांनी तीन गोष्टी साध्य केल्या : १) उच्च जातवर्गाच्या हितसंबंधांच्या शिक्षण धोरणाचा पुरस्कार केला. २) भारताने १९९१ ला उदारीकरणाचे (खाउजा) धोरण स्वीकारले. त्या धोरणाला बळकटी देण्यासाठी सरकारी शिक्षण व्यवस्थेला कमजोर करून शिक्षणाच्या खासगीकरणाला बळकट केले. ३) बाजारीकरणाला प्रोत्साहन मिळण्यासाठी कॉर्पोरेट सेक्टरला आवश्यक मनुष्यबळ तयार करण्याची मुभा दिली. या व्यवस्थेने शिक्षण क्रयवस्तू बनवली. उच्च जातवर्गाची क्रयशक्ती असल्यामुळे ते या बाजारात टिकू शकत होते. इतरांसाठी मोडकळीस आलेली सरकारी शिक्षण व्यवस्था उपलब्ध करून दिली. शिक्षण हक्क कायद्याने एका बाजूला हक्क दिल्याचा आभास निर्माण केला, दुसऱ्या बाजूला शिक्षण क्रयवस्तू केली व तिसऱ्या बाजूला सरकारी शिक्षण डबघाईस आणले.

शिक्षणाचे स्तरीकरण व खासगीकरण अस्तित्वात असल्यास शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण साध्य करता येत नाही. असे असताना शिक्षण हक्क कायदा खासगीकरण व स्तरीकरणाचे समर्थन करतो. २००९ पर्यंत टोकाचे स्तरीकरण शिक्षणात अस्तित्वात आले होते. या रचनेने प्रवेशपात्र विद्यार्थी वेगवेगळ्या स्तरांत विभागले गेले; समान लेखले गेले नाहीत. सामाजिक वास्तवाचे हे प्रतिबिंब शिक्षण व्यवस्थेत काटेकोरपणे अंमलात आणले गेले, परंतु कायद्याने याची दखल घेतली नाही. उलट, स्तरीकरणाची रचना कायम ठेवणारी भूमिका घेतली. ढोबळमानाने भारत सरकार आणि राज्य सरकारच्या शाळांमध्ये स्तरीकरण आहे. या वर्गीकरणातील स्तरीकरणाचे वास्तव लक्षात घेतल्यास बहुपदरी स्तरीकरण असल्याचे दिसून येते. रेल्वे शाळा, सैनिक शाळा, वायुसेना विभागाच्या शाळा, नवोदय विद्यालय इत्यादी शाळा अस्तित्वात आल्या आहेत. या शाळांचे केवळ नाव व विभाग वेगळे आहेत असे नाही, तर या शाळांच्या भौतिक सोयी, सांस्कृतिक व शैक्षणिक स्तर वेगवेगळे आहेत. केंद्रीय कार्यालयातील शिपाईपासून ते प्रथम श्रेणी अधिकाऱ्यापर्यंत कर्मचारी गट या शाळांमध्ये विभागलेला असतो. राज्यातील शाळांची स्थिती याहून बिकट आहे. राज्य सरकारच्या शाळा, महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायत, आश्रमशाळा, मुलींची शाळा इत्यादी शाळा अस्तित्वात आहेत. या शाळांच्या स्तरीकरणाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास केंद्रीय शाळेच्या तुलनेत राज्य सरकारच्या शाळांचे स्तर खालावलेले व बहुस्तरीय आहेत. हे खालावलेले स्तर खालून वरपर्यंत श्रेणीबद्ध आहेत. ग्रामपंचायत, आश्रमशाळेचा स्तर सर्वाधिक खालावलेला दिसतो. ग्रामपंचायतीपासून महानगरांपर्यंतच्या राज्य सरकारच्या शाळेतही स्तरीकरण आहे, परंतु हे स्तरीकरण टोकाचे नाही. या शाळांमध्ये शिकणारा समाजगट भिन्न असला, तरी त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्तरांत साम्य आहे. हा उत्पादक व श्रमिक वर्ग आहे. विविध जातींमधील मध्यम व उच्चवर्गीय या शाळांकडे फिरकत नाहीत. त्यांनी खासगी शाळा स्वीकारून आपला स्तर वेगळा ठरवलेला आहे. ही आजची स्थिती २००९ ला अस्तित्वात आली होती, तरी शिक्षण हक्क कायद्याने समान शाळा पद्धतीचा पुरस्कार केला नाही; स्तरीकरणाला संमती दिली.

शालेय व्यवस्थापन समितीने शाळा लोकांची केली व लोकांवर सोपवली. शिक्षण हक्कांच्या अज्ञानामुळे शाळा लोकांची झाली नाही. लोकांवर सोपवल्यामुळे सरकारचीही राहिली नाही. आज ती वाऱ्यावर आहे, तिचा कोणी वाली नाही.

## दिबांचे नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे!

**मो**ठ्या दिमाखात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केले. दृष्ट लागावा असा हा उद्घाटन सोहळा झाला. या विमानतळामुळे नवी मुंबईचे महत्त्व प्रचंड वाढले आहे, शिवाय मुंबईच्या विमानतळाला पर्याय उभा राहिल्याने मुंबईवरील ताणदेखील कमी पडणार आहे. त्यामुळे या विमानतळाचे सर्वांनीच स्वागत केले आहे. जवळपास तीन दशकांपासून या विमानतळाची चर्चा होती. सुरुवातीला याचा पनवेल विमानतळ असा उल्लेख केला जात असे. त्यानंतर नवी मुंबई विमानतळ असा उल्लेख झाला. मात्र, या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची स्थानिकांची मागणी आहे. पाच वर्षांपासून त्यासाठी नवी मुंबई, उरण, पनवेल तसेच ठाणे, पालघरमधील आगरी-कोळी आणि ओबीसी समाज संघर्ष करत आहे. त्यामुळे विमानतळ उद्घाटन सोहळ्यात विमानतळाला दिबांचे नाव केव्हा देणार, याची सर्वांना उत्सुकता लागली होती. मात्र, दुर्दैवाने महाराष्ट्राचे दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसेच हवाई नागरी उड्डाणमंत्री राम मोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ या सर्वांना लोकनेते दि. बा. पाटील यांचा विसर पडल्याचे दिसून आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुसता उल्लेख केला. मात्र, ज्या नेत्याचे नाव देण्याची मागणी पाच वर्षे होत आहे, ज्यासाठी आंदोलन होत आहे, सरकार सकारात्मक आहे असे दाखवते तरीही त्यांचे नाव देण्याबद्दल कोणताही स्पष्ट उल्लेख महाराष्ट्रातील नेत्यांनी केला नाही, हे नक्कीच भूषणावह नाही.



दि. बा. पाटील यांच्यामुळे महाराष्ट्रात साडेबारा टक्के धोरण मंजूर झाले. शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात त्यांना साडेबारा टक्के भूखंड देण्यासाठी दि. बा. पाटील यांनी लढा उभारला होता. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईची पायाभरणी होत असताना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिबांनी दिलेला लढा ऐतिहासिक आणि निर्णायक होता. त्याकाळी सिडकोने शेतकर्यांच्या जमिनी घेतल्यानंतर योग्य मोबदला दिला नव्हता. याविरोधात ठाणे जिल्हा, पनवेल आणि उरण तालुक्यातील स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या संतापाला दिबांनी योग्य दिशा देऊन लढा उभारला होता. या लढ्यात पाच शेतकऱ्यांना हौतात्म्य पत्करावे लागले होते. अत्यंत अभ्यासू, स्पष्ट वक्ते आणि मुख्य म्हणजे भ्रष्टाचारापासून दूर अशी दि. बा. पाटील यांची प्रतिमा होती. त्यांनी आयुष्यभर प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी आगरी आणि कोळी समाजाच्या तसेच ओबीसींच्या हक्कांसाठी आयुष्य वेचले. त्यामुळेच नवी मुंबई आकारास येत असताना स्थानिकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यात, त्यांना ताठ मानेने जगवण्यात दिबांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. दि. बा. पाटील आमदार, खासदार होते. मात्र, त्यांनी कधीही स्वहित पाहिले नाही. साधी राहणी आणि उच्च विचाराचे ते नेते होते. म्हणूनच त्यांना लोकनेते म्हटले जाते. अशा या लढवय्या नेत्याचे नाव नवी मुंबई विमानतळाला द्यावे, अशी मागणी अनेक वर्षे होत आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीचे सरकार जाता जाता त्यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाला मंजुरी दिली तर त्यानंतर जून २०२२ मध्ये आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारनेही दिबांच्या नावाला मंजुरी देत केंद्राकडे प्रस्ताव पाठवला होता. म्हणजे केंद्र सरकारकडे सव्वा तीन वर्षांपासून दिबांच्या नावाचा प्रस्ताव आहे. तरीही त्यांनी सरकार सकारात्मक आहे, एवढेच उत्तर दिले आहे. विशेष म्हणजे ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघर्ष कृती समितीला तीन महिन्यांत दिबांचे नाव देण्याची ग्वाही दिली. काही तांत्रिक कारणामुळे तीन महिने लागतील, असे मुख्यमंत्र्यांनी संघर्ष समितीला सांगितले आणि त्यावर सर्वांनी विश्वास ठेवला.

मात्र, विमानतळाचे उद्घाटन होताना कुणीही दि. बा. पाटील यांचा उल्लेखही केला नाही. या संपूर्ण कार्यक्रमात उल्लेखनीय बाब म्हणजे एकट्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचा आदराने उल्लेख केला. महाराष्ट्र पुत्र लोकनेते दि. बा. पाटील यांची आठवण काढत त्यांनी समाज आणि शेतकऱ्यांसाठी सेवाभावाने काम केल्याचे कौतुक केले. मात्र, त्यांनीही विमानतळाला दिबांचे नाव देण्याबाबत काहीही उल्लेख केला नाही. एकूणच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनाच्या कार्यक्रमात दिबांचा विसर पडल्याने स्थानिकांचा संताप आता अनावर झाला आहे. सरकारने किमान दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला केव्हा दिले जाईल, हे सांगायला हवे होते. मात्र, ज्या भूमीत आले त्याच भूमीच्या नायकाचा सर्वांना विसर पडला. यामुळे स्थानिक दुखावले गेले आहेत. कार्यक्रमानंतर याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. राज्य आणि केंद्र सरकार लोकभावनेशी खेळत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. याकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. दिबांचे नाव विमानतळाला देण्यासाठी पाच वर्षे संघर्ष सुरू आहे. प्रत्यक्षात सव्वा तीन वर्षांपासून सकारात्मक आहोत, असे सरकार सांगते. मग नाव देण्यात दिरंगाई का, याचे उत्तर दिले जात नाही आणि उद्घाटनाची तारीख जवळ आल्यानंतर तांत्रिक कारणामुळे तीन महिने लागतील, असे मुख्यमंत्री संघर्ष समितीला सांगत असतील तर यातून काय मेसेज लोकांपर्यंत जातो, याचा सरकारने विचार करण्याची गरज आहे. इतका भव्यदिव्य उद्घाटन समारंभ होऊनही नवी मुंबई विमानतळाला दिबांचे नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे!

## आखाती देशांची 'अरबी' चिंता

**सौ**दी अरेबियाची राजधानी रियाध येथे दोन आठवड्यांपूर्वी एक आगळं प्रदर्शन भरलं होतं. ते होतं, अरबी अक्षरांचं. आपली संस्कृती, वारसा आणि अस्मिता दृढ करणाऱ्या या अक्षरांचं सौंदर्य जगाला दाखविणं हा यामागचा एक उद्देश. त्याचबरोबर, आपल्या भाषेकडं जगाला आकर्षित करून त्याद्वारे सांस्कृतिक पर्यटनाला चालना देणं हा दुसरा एक उद्देश. अरबी ही केवळ एक भाषा नाही; तर ती इस्लामी संस्कृतीची वाहक आहे. पवित्र कुराणाची ही भाषा संपूर्ण इस्लामी जगतासाठी एक वारसा आहे. त्याचं केवळ जतनच नव्हे, तर संवर्धन करण्याचं लक्ष्य असलेल्या सौदी अरेबियाच्या ह्व्हिजन २०३०ह्च्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणूनही हे प्रदर्शन आयोजिण्यात आलं होतं. अरबी भाषा ही काही सौदी अरेबियापुरती मर्यादित असलेली भाषा नाही. सौदीबरोबरच कतार, कुवेत, ओमान, बहारिन आणि संयुक्त अरब अमिराती या आखाती सहकार्य परिषदेच्या (जीसीसी) देशांमधील ती प्रमुख भाषा आहेच; परंतु २६ देशांत तिला अधिकृत भाषेचा दर्जा आहे. भाषकांच्या संख्येच्या निकषावर जगातील पाचव्या क्रमांकाची भाषा असलेली अरबी ही धमार्ची आणि संस्कृतीच नव्हे, तर ज्ञान-विज्ञानाची, शिक्षणाची आणि उद्योगाचीही भाषा आहे. जगभरातील चाळीस कोटींहून अधिक लोक ही भाषा जाणतात. त्यामुळे अरबीसमोर अस्तित्वाचा प्रश्न नाही; परंतु इंग्लिशचं वाढतं आकर्षण आणि अन्य देशांतून आलेले स्थलांतरित यांमुळे आखाती देशांतच अरबी न बोलणाऱ्यांची वाढत असल्याची चिंता त्यांना भेडसावत आहे. त्यामुळेच भाषाविषयक प्रदर्शनाबरोबरच अरबी शिकविण्यापर्यंतचे उपक्रम तिथे राबविले जात आहेत. आखाती देशांतील स्थलांतरितांची संख्या ही तेथील लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक असून, त्यांपैकी बहुतेकांना अरबी भाषा येत नाही. कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी अरबी भाषक नसलेल्यांचे प्रमाण याहून अधिक आहे. एकट्या कतारमध्ये हे प्रमाण ९५ टक्के आहे! आपल्या देशांतील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्येला आपली भाषा न येणं म्हणूनच 'जीसीसी' देशांना चिंताजनक वाटत असून, ही संख्या अशीच वाढल्यास आपली अरबी अस्मिताही धोक्यात येऊ शकते, अशी भीती तेथील काही जण व्यक्त करीत आहेत. या भीतीमागे दोन ठळक कारणं आहेत. पहिलं कारण स्थलांतरित कामगारांचं आहे. स्थलांतरितांत प्रामुख्यानं दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांतील कामगार आहेत. 'ते ज्या देशांतून आले आहेत, तेथील संस्कृतीही संपन्न आहे. आखाती देशांत आल्यावरही ते विविध उपक्रमांद्वारे आपली भाषा आणि संस्कृती स्वतःपुरता टिकविण्याचा प्रयत्न करतात. ते अरबी भाषा शिकत नाहीत; किंवा अर्धवट शिकतात. अरबी बोलताना ते आपल्या भाषांतील शब्द अरबीत घुसवतात. यामुळे अरबी भाषा दूषित होत आहे,' असं मत तेथील काही अभ्यासक मांडत आहेत. स्थलांतरितांना अरबी शिकवितानाच अरबी संस्कृती अधिक ठळक करण्यासाठी काय करता येईल, याबाबत २०१३मध्ये सौदी अरेबियात परिषद झाली होती. आशियाई देशांतून आलेले लोक जी मोडकी-तोडकी अरबी बोलतात, त्याचा परिणाम अरबी मुलांच्या भाषेवर होत असल्याचा शोधनिबंध या परिषदेत सादर करण्यात आला होता.



## सकाळचा नाश्ता टाळल्यास तुमच्या आरोग्यावर होऊ शकतात त्याचे असंख्य दुष्परिणाम...

निरोगी राहण्यासाठी सकाळचा नाश्ता हा महत्त्वाचा असतो. सकाळच्या नाश्त्याची प्रत्येकाला फार गरज असते. कारण यातूनच तुम्हाला संपूर्ण दिवसभर काम करण्याची ऊर्जा मिळते. त्यामुळे तुमचे शरीर दिवसभर ताजेतवाने राहते. सकाळच्या नाश्त्याला न्याहारी किंवा ब्रेकफास्टही म्हटले जाते. तज्ञांच्या मते सकाळचा नाश्ता अधिक पौष्टिक असावा. यामुळे वजन नियंत्रित ठेवण्यासोबत शरीराला पर्याप्त प्रमाणात ऊर्जा मिळते. याव्यतिरिक्त, सकाळी लवकर न्याहारी केल्याने चयापचय संबंधित फायदे होतात. पण आता धकाधकीच्या जीवनशैलीत आपण आपल्या दैनंदिन गोष्टीकडे जीवनाकडे दुर्लक्ष करतो आणि त्याचे असंख्य दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर होतात. आजच्या लेखात आपण सकाळचा नाश्ता टाळल्यास आपल्या आरोग्यावर त्याचे काय दुष्परिणाम होऊ शकतात आणि नाश्त्यामध्ये नेमके घटक असावेत? याविषयीची माहिती पाहणार आहोत.

- सकाळचा नाश्ता टाळल्याने वजन वाढू शकते. दिवसभरातील कामं करण्यासाठी शरीराला ऊजेर्ची गरज असते. त्यामुळे सकाळी प्रोटीनयुक्त पदार्थांचा नाश्ता करावा. ज्यामुळे शरीराला आवश्यक ऊर्जा मिळेल. पण कामाच्या गडबडीमध्ये किंवा वजन कमी करण्याच्या हेतूने नाश्ता टाळला जातो, याउलट नाश्ता टाळल्याने वजन वाढू शकते. कारण नाश्ता केला नाही तर सतत भूक लागते, त्यामुळे काही तरी खात राहिल्याने वजन वाढू शकते.
- सकाळी नाश्ता न केल्यास शरीरात ऊर्जेची कमतरता जाणवते. नाश्ता न केल्यास दिवसभर थकवा जाणवू शकतो तसेच ऊर्जेची कमतरता जाणवल्याने कोणत्याही कामात लक्ष केंद्रित करणे कठीण होते.
- नाश्ता न केल्यास शरीरात प्रोटीनची कमतरता निर्माण होऊन केराटीनची पातळी अनियंत्रित होते, ज्यामुळे केसांची वाढ थांबून केसगळती होऊ शकते.
- नाश्ता टाळल्यास डोकेदुखी, मायग्रेनचा त्रास होऊ शकतो. नाश्ता टाळल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण अनियंत्रित होते, यावर नियंत्रण मिळवण्यासाठी काही हॉर्मोन रिलीज केले जातात. ज्यामुळे मायग्रेन, डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो.

## हार्मोन्स नियंत्रणात ठेवण्यासाठी धण्याचे पाणी कसे प्यावे

थायरॉईड हा एक आजार आहे ज्यामध्ये शरीरात आयोडीनची कमतरता असल्याने थायरॉईड ग्रंथीला सूज येते. थायरॉईड नियंत्रणात न राहिल्यास अनेक आजारांचा धोका वाढू लागतो. थायरॉईड रोग पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त प्रभावित करतो. आहारात सोया पावडर, सोया प्रोटीन आणि सोया कॅप्सूलचे जास्त सेवन केल्याने थायरॉईडचा त्रास होऊ शकतो. जेव्हा थायरॉईड ग्रंथी सक्रिय झाल्याने टी ३ व टी ४ हे हॉर्मोन्स शरीरात अधिक स्त्रवतात तेव्हा शरीर सर्वच प्रक्रियांसाठी मागणी करू लागते याला हाइपरथायरायडिज्म असेही म्हणतात. थायरॉईड मुख्यतः आपल्या खराब जीवनशैलीचा परिणाम असला तरी काही घटनांमध्ये अनुवांशिक थायरॉईड झाल्याचे सुद्धा दिसून आले आहे. जर आपल्यालाही हा त्रास असेल तर आज आपण त्यावर सोपा घरगुती उपाय पाहणार आहोत.



### थायरॉईडवर उपाय जाणून घेण्याआधी थायरॉईडची लक्षणे जाणून घेऊयात.

- वजनात अचानक वाढ होणे
- मांसपेशी कमकुवत होणे
- ताण व थकवा जाणवणे
- दृष्टी कमजोर होणे
- डोळे चुरचुरणे
- चिडचिड
- झोप न लागणे

### धण्याच्या पाण्याने थायरॉईड कमी होऊ शकतो का?

थायरॉईडवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक औषधे बाजारात उपलब्ध आहेत पण त्यातील सर्वात गुणकारी व त्याहूनही सुरक्षित औषध तुम्हाला किचनमध्येच सापडेल. हे औषध म्हणजे धण्याचे पाणी. आयुर्वेदिक तज्ञ व योग गुरु श्री नित्यानंदम यांच्या माहितीनुसार थायरॉईडवर उपचारासाठी धण्याचे पाणी गुणकारी ठरू शकते. या पाण्यात विविध प्रकारचे अँटी ऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे औषधीय सत्व शरीराला लाभतात. धण्यामध्ये असणाऱ्या खनिज व व्हिटॅमिनमुळे सुद्धा थायरॉड वाढवणारे हार्मोन्स कमी होण्यास मदत होते.

### धण्याच्या पाण्याचे सेवन कसे करावे?

जर आपल्याला थायरॉइडचा त्रास असेल तर दिवसातून निदान दोन वेळा तरी धण्याच्या पाण्याचे सेवन करावे. यासाठी धण्याची पावडर पाण्यात मिसळूनही आपण सेवन करू शकता. किंवा तुम्ही जेव्हा पाणी पिणार असाल त्याच्या काही वेळ आधी धण्याच्या बिया पाण्यात टाकून उकळून घ्या. धण्याच्या बिया काही वेळ पाण्यात भिऊन मग उकळल्यास अधिक फायदा होऊ शकतो.

## कंबर व पाठदुखीवर 10 पदार्थ देतील झटपट आराम

अलीकडे १० पैकी ९ लोकांचे आरोग्य हे बैठ्या जीवनशैलीमुळे बिघडलेले असते. एकाच खुर्चीवर कित्येक तास बसून काम करताना फक्त मानसिकच नव्हे तर शारीरिक ताण सुद्धा वाढत असतो. व्यायाम नसल्याने साहजिकच शरीरातील काही भागांना विशेषतः सांध्यांना मुबलक प्रमाणात पोषक सत्वांचा पुरवठा होत नाही. त्याशिवाय हाडांना सांधून ठेवणाऱ्या मांसपेशींना सुद्धा या सवयी दुर्बल करत असतात. अशावेळी तुम्ही एखादी चुकीची किंवा अचानक केलेली हालचाल सुद्धा असहाय्य वेदनांना कारण ठरू शकते.

१) **दूध:** शरीराची बहुतांश दुखणी ही कॅल्शियमच्या कमतरतेमुळे उद्भवलेली असतात. दूध हे कॅल्शियमचे समृद्ध स्त्रोत मानले जाते त्यामुळे तुम्ही दिवसातून एकदा जरी दूध पिण्याची सवय लावली तरी तुम्हाला याचा प्रभाव तुमच्या शरीराच्या बांधणीवर व लवचिकतेवर पाहायला मिळू शकतो.

२) **कोबी:** कोणत्याही रूपात कोबी खाल्ल्याने आपल्याला व्हिटॅमिन अ,उ, ङ यांचा मुबलक पुरवठा शरीराला देता येतो. कच्चा कोबी खाणे कधीही उत्तम. यातील दाहविरोधी गुणधर्मांमुळे आपल्याला सांधेदुखी कमी करण्यात मदत होऊ शकते.

३) **सुकामेवा:** काजू, बदाम, अक्रोड यामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिडमुळे सांधेदुखी कमी होण्यास व हाडे मजबूत होण्यास मदत मिळू शकते.



४) **ब्रोकोली:** ब्रोकोली मध्ये सुद्धा अँटी इन्फ्लेमेंटरी सत्वांचा साठा असतो, यामुळे कार्टिलेजचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते, या प्रभावाने कंबर दुखी व पाठदुखीला सुद्धा दूर करता येऊ शकते.

५) **कडधान्य:** कडधान्यांमधील अँटी इन्फ्लेमेंटरी गुणांमुळे तुम्हाला पाठदुखी दुर करता येऊ शकते. शिवाय जर तुम्हाला व्हीसीहेशतः पाठ किंवा कंबरेला दुखापत झाली असेल तर या ठिकाणच्या मांसपेशींचे नुकसान भारून काढण्यासाठी सुद्धा कडधान्यांची मोठी मदत होऊ शकते.

६) **मासे, (पडवे):** माशांमध्ये मुळातच ओमेगा ३ फॅटी ॲसिड व तेलाची मूल्ये अधिक असतात यामुळे मांसपेशींना वंगण मिळू शकते ज्यामुळे आओपापच हाडांची लवचिकता वाढून आपल्याला विना पाठदुखी हालचाल करता येते.

७) **ऑलिव्ह ऑइल:** दाह व युरिक ॲसिडचे प्रमाण कमी करण्यासाठी ऑलिव्ह ऑइल हा नियमित तेलासाठी उत्तम पर्याय ठरतो. आपण कमी प्रमाणात का होईना ऑलिव्ह ऑइलचे सेवन करण्याचा विचार करू शकता, यामुळे हाडांना झालेल्या दुखापतीतूनही लवकर बरं होण्यास मदत मिळते.

८) **रासबेरी:** सफरचंद, अननस, बेरी, चेरी, द्राक्षे आणि लिंबूवर्गीय फळांमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि अँटिऑक्सिडंट असतात जे गुडघे आणि पाठदुखीमुळे होणारी जळजळ कमी करण्यास मदत करतात.

९) संपूर्ण धान्य जसे गहू, तपकिरी तांदूळ, बाजरी, बार्ली, इत्यादी, पाठदुखीपासून मुक्त होण्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरतात. यामध्ये खनिजे आणि जीवनसत्त्वे यासह महत्त्वपूर्ण पोषक सत्व असतात. महत्त्वाचे म्हणजे, फायबरमुळे शरीरात शॉर्ट-चेन फॅटीॲसिड तयार होऊन जळजळ कमी करण्यास मदत होते.

१०) जेव्हा एखाद्या व्यक्तीला वेदना होतात, तेव्हा वेदनांमुळे त्यांचे स्नायू घट्ट होत असतात अशावेळी मॅग्नेशियम समृद्ध अन्न स्नायूंना मोकळे करते. म्हणूनच केळी, पालक अशा गोष्टींचा आहारात समावेश करायला हवा.

## या ५ गोष्टींनी मिटवा गोडाची तल्लफ, बॅल्ली फॅट एक इंचही वाढणार नाही

बाहेर आलेले पोट किंवा लठ्ठपणामुळे लटकणारी चरबी खूपच वाईट दिसते हे तर तुम्ही देखील मान्य कराल. जगभरातील करोडो लोक या समस्येशी झुंजत आहेत. त्यामुळे, हृदयविकार, पक्षाघात, स्लीप एपनिया फॅटी लिव्हर आणि अनेक आजार होतात. जर तुम्हाला मिठाई खूप आवडत असेल आणि तुम्ही प्रमाणाच्या बाहेर गोड खात असाल तर नक्कीच आयुष्यात कधी ना कधी तुम्हालाही वाढलेल्या पोटाचा सामना करावा लागेल. पोट वाढले की त्यावर सामान्य उपाय म्हणजे वजन कमी करण्यावर भर देणे.

पण लोकांना वजन कमी करणे खूप कठीण जाते, कारण यासाठी त्यांना साखरयुक्त आणि चरबी वाढवणारे पदार्थ सोडून द्यावे लागतात. हे पदार्थ सोडले तर कारण खाय, आयुष्यात मज्जा नाय असे विचार त्यांना सतावू लागतात. तुम्ही देखील अशाच व्यक्तींपैकी एक असाल तर आज आम्ही तुम्हाला असे काही गोड पदार्थ सांगणार ज्या खाल्ल्याने मिठाईची तल्लफ शमवता येते. हे गोड पदार्थ खाल्ल्याने चरबी एक इंचही वाढणार नाही.

**मेवा –** सुक्या मेव्यामध्ये सर्व जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. बदाम, काजू, अक्रोड इत्यादींसोबत मनुका खाल्ल्याने मिठाईची लालसा कमी होऊ शकते. ठउइक संशोधनानुसार, त्यात नैसर्गिक साखर असते आणि ती भूक कमी करण्यासाठी ओळखली जाते. त्यामुळे गोड असूनही वजन वाढत नाही. मात्र, तरीही हे नियंत्रणातच खावे.

**गूळ –** गूळ खाल्ल्याने खराब पचनक्रियाही दूर होते. साखरेला हा एक उत्तम पर्याय आहे. हे खाल्ल्याने निरोगी व्यक्तीची मिठाईची लालसा सहज संपुष्टात येते. गुळ हा लोह, प्रथिने, कॅल्शियम, अनेक जीवनसत्त्वे यांचा मजबूत स्त्रोत आहे.

**स्टीव्हियाची पाने –** आता पुढच्या वेळी मन मारून फिकी चहा-कॉफी पिण्याची गरज नाही. ह्या चहा-कॉफी मध्ये स्टीव्हियाची पाने घाला. हे एक नैसर्गिक स्वीटनर आहे, जे मधुमेहामध्ये देखील सुरक्षित मानले जाते. मात्र, योग्य प्रमाणाची काळजी घ्यायला विसरू नका.

**मध –** मधामध्ये अँटी-इन्फ्लमेट्री आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. साखरेला हा एक नैसर्गिक पर्याय आहे, जो खूप आरोग्यदायी आहे. तुम्ही ते रोज नियंत्रित प्रमाणात याचे सेवन करू शकता. पण मधुमेही रुग्णांसाठीही ते हानिकारक ठरू शकते.

**फळे –** गोड खाण्यासोबतच जर पोषण मिळाले तर किती भारी ना, मंडळी यासाठी सफरचंद, केळी, आंबा इत्यादी फळे खा. यामध्ये नैसर्गिक साखर असते, जी मर्यादित प्रमाणात खाल्ल्यास नुकसान करत नाही आणि वजन नियंत्रणात ठेवते.



## घरगुती पद्धतीने चेहऱ्यावर घ्या वाफ, स्वच्छ आणि चमकदार त्वचा मिळवा

१. वाफ घेतल्याने ताण कमी होतो. तसेच वाफ घेतल्याने चेहऱ्यावरील त्वचेच्या रक्त परिसंचरणात सुधार होतो. याने त्वचा रक्त वाहिनींना पसरण्यात मदत मिळते आणि पेशींमध्ये रक्त प्रवाह वाढतो. अशाने त्वचेला पोषक तत्व आणि ऑक्सीजन अधिक प्रमाणात मिळते आणि त्वचा तरुण दिसू लागते.

२. त्वचेवरील डेड स्कीन स्वच्छ करण्यासाठी आणि नैसर्गिक रीत्या त्वचा चमकदार व्हावी यासाठी वाफ घेणे एक योग्य उपाय आहे. याने कोणतेही ब्युटी प्रोडक्ट्स न वापरता आपण ग्लोइंग स्किन मिळवू शकता.

३. चेहऱ्यावर वाफ घेतल्याने त्वचेत आढळणारे टॉक्सिन हटण्यास मदत मिळते. केवळ चेहऱ्यावरील वाफाने देखील शरीरात विषाक्त पदार्थांपासून मुक्ती मिळू शकते.

४. चेहऱ्यावरील मृत त्वचा हटवण्यासाठी आणि सुरकुत्या कमी करण्यासाठी वाफ घ्यावी. याने त्वचा ताजीतवानी दिसते आणि त्वचेवरील ओलावादेखील कायम राहण्यास मदत मिळते. ड्राय स्कीन असणाऱ्यांसाठी वाफ घेणे फायदेशीर ठरेल.



५. चेहऱ्यावर मुरुम असल्यास वाफ घेतल्याने छिद्रांमध्ये जमा असलेली घाण, बॅक्टेरिया सहज बाहेर निघतात आणि त्वचा स्वच्छ दिसू लागते.

### कशा प्रकारे घ्यावी वाफ

- सर्वात आधी सुविधापूर्ण जागेची निवड करा.
- यासाठी टेबल योग्य पर्याय आहे.
- यासाठी आपल्याला एका टॉवेलची गरज असेल.
- वाफ घेण्यापूर्वी आपले केस बांधून घ्यावे.
- वाफ घेण्यापूर्वी चेहरा आणि मान स्वच्छ करुन घ्यावी.
- नंतर एका भांड्यात ४-५ ग्लास पाणी उकळून घ्या.
- गॅस वर वाफ घेण्याची चूक करु नका.
- भांड्यापासून ६ ते ८ इंच लांबीवर चेहरा ठेवा.
- डोक्यावरुन टॉवेल घ्या आणि गरम वाफ चेहऱ्यावर येऊ द्या.
- आपल्या आवश्यकतेप्रमाणे आपण यात तेलाचे काही थेंब मिसळू शकता.
- आपल्या अधिक गरम जाणवत असल्यास आपलं डोक वर करा आणि टॉवेलची एक बाजू मोकळी करा.
- अशा प्रकारे प्रत्येक २ मिनिटाच्या अंतराळाने वाफ घ्या.



## सायलेंट किलर आहे ऑस्टियोपोरोसिस अजिबात दुर्लक्ष करू नका

उत्तम आरोग्यासाठी हाडे मजबूत असणे खूप महत्वाचे आहे. शरीराला आधार देण्यासोबतच अवयवांचे रक्षणही करण्याचे काम हाडे करत असतात. वृद्धत्व किंवा बैठी जीवनशैलीमुळे ऑस्टिओपोरोसिस होऊ शकतो, हा असा आजार आहे ज्यामध्ये हाडे पोकळ होतात. रोग गंभीर होण्याच्या १ महिन्यापूर्वी त्याची ७ प्रमुख लक्षणे दिसून येतात.

### ऑस्टियोपोरोसिस म्हणजे काय?

डॉ. चिंतन हेगडे, वरिष्ठ सल्लागार, ऑर्थोपेडिक्स, प्रिस्टाइन केअर यांनी सांगितले की, ऑस्टियोपोरोसिसमध्ये हाडांची घनता कमी होते आणि हाडांच्या ऊती खराब होऊ लागतात. त्यामुळे फ्रॅक्चरचा धोका वाढतो. त्याच्या काही लक्षणांवर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे.

### ऑस्टियोपोरोसिसची सुरूवातीची लक्षणे

- पाठीचा कणा, मनगट, कूल्हे सहजपणे फ्रॅक्चर होतात
- कमरेला वाकल्यामुळे उंची कमी होते
- पाठदुखी
- हाडे-सांधे दुखणे
- कमकुवत हाताची पकड
- हिरड्या आणि दात कमकुवत होणे
- कमकुवत नखे
- चुकीचे पोस्चर

ठिसूळ हाडांमध्ये येईल ताकद

डॉ.चिंतन हेगडे म्हणाले की, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी समृद्ध आहारामुळे ठिसूळ हाडे मजबूत होतात. दुग्धजन्य पदार्थ, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा आणि फोर्टिफाइड पदार्थांचा आहारात समावेश करा.

### नियमित एक्सरसाइज आणि औषधे

ऑस्टिओपोरोसिस टाळण्यासाठी चालणे, जॉगिंग, डान्स यांसारखे वजन उचलण्याचे व्यायाम केले पाहिजेत. यामुळे हाडांची घनता आणि ताकद सुधारते. त्याच वेळी, डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर, आपण हाडांची झीज रोखणारी औषधे शोधू शकता.

### काय करावे काय टाळावे दारू

धुम्रपानामुळे तरुण वयातही हाडे कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे या सवयी लगेच सोडा. त्याच वेळी, पडणे आणि घसरण्याचा धोका कमी करण्यासाठी, हँडल्स पकडून चढणे, उजेडात चालणे यासारख्या गोष्टींची काळजी घ्या.

### बोन डेंसिटी टेस्टिंग करावी

वृद्ध व्यक्तींना हाडांची झीज होण्याचा धोका जास्त असतो. म्हणूनच डॉक्टर ६५ वर्षांवरील महिला आणि ७० वर्षांवरील पुरुषांना हाडांची घनता चाचणी करण्याची शिफारस केली जाते.

## घरी बसून मांड्या झाल्या असतील जाड तर फक्त ५ मिनिटं करा हा व्यायाम

महिलांमध्ये शरीराचे वाढलेले वजन हे नितंब आणि मांड्यांमध्ये दिसून येते. या मांड्या जास्त वाढल्या की, तुम्हाला चालताना याचा त्रास होतो. घरी बसून तुमच्याही मांड्या अशात जाड दिसू लागल्या असतील तर तुम्ही फक्त दिवसातील ५ मिनिटं काढा आणि आम्ही सांगतो तो सोपा व्यायाम करा. अगदी गाणी ऐकत ऐकतही तुम्हाला हा व्यायाम करता येईल. मग जाणून घेऊया हे व्यायाम...

- प्ली स्कॉट्स - दोन पायांमध्ये अंतर घ्या. पायाचे समोरच्या दिशेला असून द्या. कमरेवर हात ठेवून तुम्हाला स्कॉट्सप्रमाणे खाली बसायचे आहे. असे करताना तुम्हाला पूर्ण खाली बसायचे नाही. तर तुमच्या नितंबावर आणि मांड्यावर ताण येईल एवढे बसायचे आहे. असे करताना तुम्हाला कंबरेच्या खाली ताण येणेही अगदी स्वाभाविक आहे. सगळ्यात आधी १० प्ली स्कॉट्सने सुरुवात करा. त्यानंतर तुम्ही हे स्कॉट्स वाढवू शकता. पण जर तुम्हाला हा व्यायाम करुन काहीच बदल जाणवत नसेल याचा अर्थ तुमच्या शरीराला याची सवय झाली आहे. त्यामुळे तुम्ही हा व्यायामप्रकार एक दिवस आड करा.



- प्ली स्कॉट्चा वेगळा प्रकार - आता हा प्रकार प्ली स्कॉट्सचाच एक प्रकार आहे. तुम्हाला अगदी तसेच तुमच्या पायांमध्ये अंतर घ्यायचे आहे. आता तुम्हाला नमस्कार करुन अगदी खाली बसायचे आहे. पायांमध्ये जितके जास्त अंतर घ्याल तितकाच तुम्हाला याचा परिणाम जाणवेल. आता खाली बसताना तुम्हाला अगदी थोडे थोडे स्वतःला वर उचलायचे आहे. असे करताना तुम्हाला मांड्याचा आत आलेला ताण अगदी सहजच जाणवेल. तुम्हाला जितका वेळ स्वतःला असे रोखून धरणे शक्य आहे. तितके तुम्ही करा. हा व्यायाम तुमच्या मांड्यावरील अतिरिक्त मासं नक्कीक कमी करते.
- लेग सीझर - आता जर तुम्ही फारच आळशी असाल तर तुम्ही झोपून हा व्यायाम करु शकता. तुम्हाला तुमची पाठ टेकवायची आहे. पाय ९० अंशावर वर उचलून तुम्हाला ते आत बाहेर करायचे आहे. तुम्ही तुमचा पाय जितका स्ट्रेज करु शकता तितका तुम्हाला करायचा आहे. यामुळेही तुमच्या मांड्याच्या आत ताण आलेला तुम्हाला जाणवेल.
- स्पॉट जॉगिंग - आता तुम्हाला जर बाहेर जाणे शक्य नसेल तर तुम्ही एकाच ठिकाणी उभे राहून स्पॉट जॉगिंग अगदी आरामात करु शकता. स्पॉट जॉगिंग हा एक प्रकारे कार्डिओ व्यायाम प्रकार आहे. यामुळेही तुमच्या कॅलरीज बर्न होतात आणि तुमच्या मांड्यांवरील अतिरिक्त फॅटही कमी होते.

## पार्यया चढताना तुम्हाला दम लागतो का? 'या' ५ पैकी एका गंभीर आजाराचा धोका



सधाच्या धावपळीच्या आणि व्यस्त जीवनात बहुतेक लोक त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. दुसरीकडे, कोरोना महामारीमुळे अनेकांच्या जीवनशैलीत खूप बदल झाला आहे. वर्क फ्रॉम होम, व्यायामाचा अभाव यामुळे अनेक लोकांच्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम होत आहे. सकस आहाराची कमतरता आणि दीर्घकाळ घरात राहिल्यामुळे लोक अशक्तही होऊ लागले आहेत.

### पार्यया चढताना तुम्हाला दम लागतो का?

अनेकांना काही पाऊल चालल्यावर किंवा एखादं लहान काम करताना दम लागतो. काही जण शरीराची थोडी जास्त हालचाल झाल्यावर अस्वस्थ होतात आणि त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. मात्र, याकडे दुर्लक्ष करु नका. हे, धोकादायक आजाराचे गंभीर लक्षण असू शकते. मानवाला जगण्यासाठी श्वासोच्छ्वास ही अत्यंत महत्त्वाची क्रिया आहे. म्हणूनच जेव्हा जेव्हा तुमच्या शरीरात एखादा धोकादायक आजार येतो तेव्हा सर्वप्रथम तुम्हाला त्रास होऊ लागतो.

### 'या' ५ पैकी एका गंभीर आजाराचा धोका

हेल्थ डायरेक्ट नुसार, फुफ्फुसाचे आजार, हृदयविकार, फुफ्फुसात किंवा हृदयामध्ये संसर्ग, पॅनीक अटॅक आणि फुफ्फुसाच्या रक्तवाहिनीत अडथळा यांमुळे श्वासोच्छ्वासाचा त्रास होऊ शकतो आणि तुम्ही पायऱ्या चढून किंवा वेगाने चालता तेव्हा श्वासोच्छ्वासाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे या पाच गंभीर आजारांचा धोका असल्याने यावर वेळीच उपाय करा.

### याकडे दुर्लक्ष करण्याची चूक करू नका

अनेक लोक जिने चढण्याऐवजी लिफ्ट वापरण्यास प्राधान्य देतात, कारण दोन-चार पायऱ्या चढताच त्यांचा श्वास फुलायला लागतो. काही पाऊल चालल्यावर त्यांना दम लागतो आणि त्यांच्या हृदयाचे ठोकेही वाढतात. पायऱ्या चढताना धाप लागणे ही सामान्य गोष्ट आहे, पण जर एखाद्या व्यक्तीला असे जास्त वेळ होत असेल तर याकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे. यावर घरगुती उपाय जाणून घ्या.

### छातीत दुखत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या

श्वासोच्छ्वास करण्यास त्रास होत असेल किंवा खोकला, छातीत दुखणे, छातीत गच्च वाटणे, वारंवार शिंका येणे, नाक बंद होणे आणि घसा खवखवणे यामुळे तुम्हाला अस्वस्थ वाटत असेल तर या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका, आणि वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

### बदलत्या ऋतूत काळजी घ्या

सध्या हवामान खूप वेगाने बदलत आहे. बदलत्या हवामानात श्वसनाचे आजार खूप धोकादायक ठरतात. अशा वेळी व्हायरस आणि बॅक्टेरियाचा धोका वाढतो. ज्यामुळे तुमच्या विंडपाइपमध्ये सूज येऊ लागते. त्यामुळे बदलत्या वातावरणात आरोग्याची विशेष काळजी घ्या.

### धूम्रपान करू नका किंवा जंक फूड खाऊ नका

धूम्रपान, मद्यपान, जास्त जंक फूड खाल्ल्याने श्वासोच्छ्वासासंबंधित आजारांचा त्रास वाढू शकतो. अशा वेळी बाहेरचे अन्नपदार्थ खाणं टाळा. यामुळे हा गंभीर आजार होऊ शकतो.

### फुफ्फुसांना डिटॉक्स करा, सकस आहार घ्या

बदलत्या वातावरणात फुफ्फुसांच्या संसगार्पासून बचाव करण्यासाठी तसेच डिटॉक्सिंग करा. यासाठी अँटिऑक्सिडंट्स युक्त योग्य आहार घेणं आवश्यक आहे. यामुळे हळद, टोमॅटो, लिंबूवर्गीय फळे, भोपळा, सफरचंद, बीटरूट यांचा आहारात समावेश करा.

### आलं ठरेल रामबाण उपाय

जर तुम्हाला श्वासोच्छ्वासासंबंधित त्रास जाणवत असेल तर आलं हा रामबाण उपाय ठरेल. यामुळे फुफ्फुसांमधील संसर्ग कमी करण्यात मदत होईल. यासाठी आले, लिंबू आणि मधाचा बनवलेला हर्बल चहा रोज प्या. हा चहा फुफ्फुसातील नसांना आराम देण्यासोबतच डिटॉक्स होण्यास मदत करतो.

# मिरा-भाईंदर पालिकेचा हरित यशोगाथा सन्मान पुरस्काराने गौरव

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव येथे १४ ऑक्टोबर रोजी आयएफएटी इंडियाकडून घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन विषयक भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मिरा-भाईंदर महापालिकेला महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत हरित यशोगाथा सन्मान २०२५ या राज्यस्तरीय प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले.

सेलिब्रेटिंग महाराष्ट्र क्लायमेट लीडरशिप द लोकल लेव्हल या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार वितरित करण्यात आला. मिरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने आयुक्त राधाबिनोद शर्मा , उपायुक्त कल्पिता पिंपळे, कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर यांनी हा सन्मान पुरस्कार स्वीकारला. तसेच, या कार्यक्रमात मिरा-भाईंदर महापालिकेच्या महिला बचत गटांच्या माध्यमातून राबविण्यात येर्णाया फराळ सखी उपक्रमाची माहिती आयुक्तांनी उपस्थित मान्यवरांना दिली. महिलांच्या आत्मनिर्भरतेस प्रोत्साहन देर्णाया या उपक्रमांतर्गत स्थानिक बचत गटांकडून तयार करण्यात आलेल्या दिवाळी फराळ वस्तूंचे आकर्षक हॅम्पर्स तयार करण्यात आले आहेत. आयुक्तांच्या हस्ते खासदार श्रीकांत शिंदे आणि प्रसिद्ध सिनेअभिनेत्री तथा



संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण सदिच्छा दूत दिया मिर्झा यांना फराळ सखी उपक्रमातील पदार्थ भेट म्हणून देण्यात आले.

गोरेगाव येथे आयोजित केलेल्या या प्रदर्शनात मिरा- भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर आधारित माहितीपूर्ण आणि आकर्षक स्टॉल उभारण्यात आला होता. शहरात राबविण्यात येणाऱ्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती, तांत्रिक सादरीकरणे आणि शाश्वत प्रकल्पांचे दस्तावेज प्रदर्शनात मांडण्यात आले. आयुक्तांनी यावेळी विविध शासकीय आणि खासगी संस्थांच्या स्टॉलना भेट देऊन नव्या तंत्रज्ञानाबाबत माहिती घेतली.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा!

## खचलेल्या, बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी राज्य सरकारकडून मिळणार ३० हजारांपर्यंत अर्थसहाय्य

**■मुंबई। प्रतिनिधी,**

खरीप हंगामात राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे खचलेल्या तसेच गाळाने बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी कमाल ३० हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विहिरीच्या दुरुस्तीसाठी त्वरित अर्ज करा, असे आवाहन राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केले आहे. दरम्यान, दुरुस्त झालेल्या विहिरींचे जिओ टॅगिंग करणे बंधनकारक असणार आहे.

नियोजन विभागाने (रोहयो प्रभाग) घेतलेल्या या निर्णयानुसार, पूरस्थितीमुळे नुकसान झालेल्या आणि ज्या विहिरींचे पंचनामे झाले आहेत, त्यांच्या दुरुस्तीसाठी ही योजना लागू असेल. दुरुस्तीच्या कामांसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च किंवा प्रति विहीर कमाल ३० हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, तेवढे अर्थसहाय्य शेतकऱ्याला मिळणार आहे.



या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी गट विकास अधिकारी यांच्याकडे तातडीने लेखी अर्ज करणे अनिवार्य आहे. अर्जासोबत विहिरीची नोंद असलेला सातबारा जोडणे बंधनकारक आहे.

**आगाऊ मदत मिळणार!**

शेतकऱ्याला दुरुस्तीचे काम त्वरित सुरू करता यावे, यासाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पात्र लाभार्थ्यास अनुज्ञेय असलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या ५० टक्के रक्कम (कमाल १५ हजारांपर्यंत) आगाऊ स्वरूपात उपलब्ध करून दिली जाईल. उर्वरित ५० टक्के रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर आणि कृषि सहायक व तांत्रिक अधिकारी यांच्या संयुक्त मोजमापाद्वारे कामाची खात्री झाल्यावर शेतकऱ्याला वितरीत केली जाईल.

# मध्य रेल्वे प्रशासनाचा सर्वात मोठा निर्णय

## दिवाळी काळात 'या' स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यभरात दिवाळी सणाच्या पूर्वसंध्येला उत्साहाचं वातावरण आहे. दिवाळी काही दिवसांवर असल्याने प्रत्येक शहरातील बाजारपेठांमध्ये गर्दी बघायला मिळत आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्या असून सुट्ट्या देखील लागल्या आहेत. अनेक जण दिवाळी साजरी करण्यासाठी गावाकडे निघाले आहेत. तसेच अनेक जण दिवाळीच्या निमित्ताने गावी जाणार आहेत. तसेच दिवाळी संपल्यावर आपापल्या शहरातील घरी परतणार देखील आहेत. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रवास करणाऱ्यांची संख्या खूप मोठी असेल. कोट्यवधी नागरीक रेल्वेने प्रवास करतील. या गर्दीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला आहे. दिवाळी काळात काही रेल्वे स्थानकांवर आता प्लॅटफॉर्म तिकीट मिळणार नाही. मध्ये रेल्वे प्रशासनाने काही महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर गर्दी होते म्हणून दिवाळी काळात प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती बंदी घातली आहे.

उत्सव काळातील गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती बंदी घातली आहे. रेल्वे प्रशासनाकडून याबाबत अधिकृतपणे प्रसिद्धी पत्रक जारी करत माहिती देण्यात आली आहे. येत्या दिवाळी आणि छठ पूजा उत्सवानिमित्त प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी आणि सुरळीत प्रवास सुनिश्चित करण्यासाठी, मध्य रेल्वेने निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते



निर्बंध लादले आहेत. या उपाययोजनाचा उद्देश प्लॅटफॉर्मवरील गर्दीचे नियमन करणे आणि स्थानक परिसरात त्रासमुक्त हालचाल सुनिश्चित करणे आहे.

प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवरील निर्बंध 16 ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबरपर्यंत लागू राहतील. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पनवेल या स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिट विक्रीवर तात्पुरती बंदी असणार आहे. तरीही रेल्वे मंडळाच्या मार्गदर्शनानुसार, वरिष्ठ नागरिक, आजारी प्रवासी, मुले आणि मदतीची आवश्यकता असलेल्या महिला प्रवाश्यांना प्लॅटफॉर्म तिकीट जारी केले जाईल.

प्रवाशांना विनंती आहे की, त्यांनी त्यांच्या प्रवासाचे नियोजन त्यानुसार करावे आणि उत्सवाच्या काळात प्रवास सुरळीत आणि सुरक्षित व्हावा यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असं आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

# महिला स्वयंपाकींच्या मानधनात वाढ...

## १ नोव्हेंबरपासून अंमलबजावणी



**■मुंबई। प्रतिनिधी,**

कुपोषण, मातामृत्यू, बालमृत्यू आदी समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी डॉ एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत सकस आहार देण्यात येतो. या योजनेंतर्गत पोषण आहार आहार बनविणाऱ्या महिला स्वयंपाकींच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता एक हजार रुपयांऐवजी २ हजार रुपये मानधन मिळणार असून याची १ नोव्हेंबरपासून अंमलबजावणी होणार आहे. अनुसूचित क्षेत्रातील कुपोषण, मातामृत्यू, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांसारख्या गंभीर समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या अंगणवाडयामार्फत अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना १ डिसेंबर, २०१५ पासून सुरू करण्यात आली. तसेच अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रति दिन शाकाहारी मुलांना २ केळी व मांसाहारी मुलांना १ उकडलेले अंडे आठवड्यातून ४ वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस एकवेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी गरोदर व स्तनदा मातेसाठी एकवेळचा पोषण आहार तयार करणे व ७महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी अंडी उकडणे इत्यादी अनुषंगिक कामासाठी दरदिवशी दोन तास कालावधी करता, प्रत्येक अंगणवाडी अंतर्गत एक महिला स्वयंपाकीची नेमणूक ग्रामसभेच्या सहमतीने आहार समितीकडून करण्यात येते व सदर महिला स्वयंपाकीसाठी अनुज्ञेय दरमहा १ हजार इतका मानधनाचा खर्च अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना उपलब्ध करून दिलेल्या ५ टक्के अबंध निधी योजनेच्या निधीमधून अदा करण्यात येतो.

# आरएमसी प्लांटवर प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर शहरातील घोडबंदर परिसरात चालणाऱ्या रेडी मिक्स काँक्रिट प्लांटविरुद्ध विरोधात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचाशी केलेल्या अधिकृत पत्र व्यवहारनंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्याकडून सखोल चौकशी करण्यात आली. त्यानंतर आरएमसी प्लांटवर कठोर कारवाई करत तत्काळ बंदीचा आदेश जारी केला आहे.

सदरील आरएमसी प्लांटमधून गंभीर स्वरूपाचे वायू व ध्वनी प्रदूषण होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली होती. ९ सप्टेंबर रोजी घोडबंदर गावातील नागरिकांकडून आरएमसी प्लांटमुळे होत असलेल्या धूळ व वायूप्रदूषणाबाबत मंडळाकडे तक्रार दाखल झाली. ११ सप्टेंबर रोजी अधिकर्यांनी स्थळाची पाहणी केली असता गंभीर त्रुटी आढळल्या. तपास अहवालानुसार मिक्सिंग प्लांट झाकलेला



नसल्याने मोठ्या प्रमाणात धूळ उडत होती. तसेच साठवण व कार्यक्षेत्रात पाणी शिंपडण्याची कोणतीही सोय नव्हती.


नियमानुसार ३० फूट उंच बॅरिकेडऐवजी फक्त १० फूट टिनची भिंत उभारण्यात आली होती. तसेच ट्रान्झिट मिक्सर वाहनांसाठी टायर वॉशिंग सुविधा नव्हती आणि ना हि सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन (काँक्रीट पिट) उपलब्ध होते. त्याचसोबत वायू गुणवत्तेचे निरीक्षण यंत्र देखील सर्व्हरशी जोडलेले नव्हते. या सर्व त्रुटींमुळे परिसरात धूळ आणि वायूप्रदूषण वाढून नागरिकांना गंभीर आरोग्य धोका निर्माण झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. मिरा-भाईंदर परिसरातील खालील सहा आरएमसी प्लांटविरुद्ध नागरिकांकडून सतत तक्रारी होत होत्या. त्यात लाईम स्टोन, सर्व्हे क्रं. ८, घोडबंदर रोड व ग्रास सिमेंट्स सर्व्हे क्रं. ६/३, घोडबंदर रोड, सोनम बिल्डर्स सर्व्हे क्रं. ८, घोडबंदर रोड, हिरकॉन इन्फ्रा सर्व्हे क्रं. १४/४, चिंचबा देवी मंदिर समोर, घोडबंदर गाव, काशिमिरा व राज ट्रान्सिट इन्फ्रा प्रा.ली. शेड नंबर ३२, तळमजला, डी.एस. पटेल कंपाऊंड आणि जे.व्ही.आय. ॲडव्हान्स टेक्निकल एल.एल.पी. घोडबंदर रोड या सर्व सहा प्लांटमधून पर्यावरणीय हानी होत असल्याचे नमूद करत, मंत्री सरनाईक यांच्या माध्यमातून नागरिकांनी थेट राज्य सरकारकडे तक्रार केली होती. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारवाईनंतर नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, ही फक्त सुरुवात आहे. प्रदूषण करर्णाया सर्व युनिट्सविरुद्ध कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# सेक्स रॅकेटप्रकरणी महिलेस अटक... ३ तरुणींची सुटका

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ऑनलाईन चालणाऱ्या सेक्स रॅकेटप्रकरणी एका महिलेस पंतनगर पोलिसांनी अटक करुन तिच्या तावडीतून तीन तरुणींची सुटका केली. या तरुणींच्या चौकशीत अटक महिला ऑनलाईन सेक्स रॅकेट चालवत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे रियाा नावाच्या या महिलेविरुद्ध पोलिसांनी भारतीय न्याय सहितेसह पिटा कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याच गुन्ह्यांत ती सध्या पोलीस कोठडीत आहे तर तिन्ही मुलींना मानखुर्दच्या महिला सुधारगृहात पाठविण्यात आले. अंबरनाथ येथे राहणारी रिया ही काही ग्राहकांना तिच्या संपर्कातील तरुणींना वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांना ग्राहकासोबत विविध हॉटेलमध्ये पाठवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनंतर पोलिसांनी एका बोगस ग्राहकाच्या मदतीने त्याची शहानिशा केली होती. या बोगस ग्राहकाने रियाशी संपर्क साधून तिच्या मोबाईवरच सर्व आर्थिक व्यवहार करुन तिला तरुणींना घेऊन घाटकोपर येथे येण्यास सांगितले होते.

ठरल्याप्रमाणे शनिवारी दुपारी तीन वाजता रिया ही तीन तरुणीसोबत घाटकोपरच्या एका हॉटेलमध्ये आली होती. यावेळी त्यांच्यात आर्थिक व्यवहार सुरु असताना पोलिसांनी




तिथे छापा टाकून रियाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी तीन तरुणींची सुटका केली. त्यांच्या चौकशीत रिया ही सेक्स रॅकेट चालवत असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे तिच्यावर विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करुन तिला पोलिसांनी अटक केली. सुटका केलेल्या तिघींना नंतर मेडीकलसाठी पाठविण्यात आले होते. मेडीकलनंतर त्यांना मानखुर्दच्या महिला सुधारगृहात पाठविण्यात आले होते. या कारवाईत पोलिसांनी ९५ हजार रुपयांचे वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, १० हजार ८७० रुपयांची कॅश आणि ७२० रुपयांच्या एका पर्ससह इतर मुद्देमाल जप्त केला आहे.

**खंडणीप्रकरणी मनपाच्या तोतया अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल**

चेंबूर येथे राहणाऱ्या महिलेकडे अडीच लाखांची खंडणीसाठी धमकी देण्यात आली आहे. याप्रकरणी अमोल नावाच्या मनपाच्या तोतया अधिकाऱ्याविरुद्ध गोवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ५४ वर्षांची तक्रारदार महिला चेंबूर येथे राहते. तिने तिच्या घराचे बांधकाम सुरु केले होते. ते बांधकाम सुरु असताना ९ ऑक्टोंबरला तिच्याकडे अमोल नावाचा एक तरुण आला. त्याने तो मनपा अधिकारी असल्याचे सांगून तिने सुरु केलेल्या बांधकामाची परवानगी घेण्यात आली नाही. तिच्यावर कोर्ट केस करुन तिचे घर सील करण्याची धमकी दिली होती. ही कारवाई होऊ नये म्हणून त्याने तिच्याकडे अडीच लाखांची मागणी केली होती. त्यामुळे तिने घरावर कारवाई होऊ नये म्हणून त्याला एक लाख रुपये दिले होते. त्यानंतर तो तेथून निघून गेला होता.

काही दिवसांनी त्याने तिला उर्वरित पैशांसाठी कॉल केला होता. तो सतत तिच्याकडे पैशांची मागणी करत होती. हा प्रकार संशयास्पद वाटताच तिने गोवंडी पोलिसांना घडलेला प्रकार सांगून अमोलविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रारीनंतर त्याच्याविरुद्ध पोलिसांनी खंडणीसाठी धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. तपासात अमोलचा मनपाशी काहीही संबंध नसून त्याने खंडणीची रक्कम उकाळण्यासाठीच तक्रारदार महिलेला धमकी दिल्याचे तपासात उघडकीस आले आहे. तो पळून गेल्याने त्याचा पोलिसांकडून शोध सुरु आहे.

## सरन्यायाधीशांचे कोर्ट दाखवत डिजिटल अरेस्ट

# नाशकात दोन वृद्धांना तब्बल ६.७५ कोटींना चुना

**■नाशिक। प्रतिनिधी,**

आर्थिक गैरव्यवहार आणि अश्लील फोटो व्हायरल झाल्याचे सांगत डिजिटल अरेस्ट करत दोन ज्येष्ठ नागरिकांकडून तब्बल ६.७५ कोटी रुपये उकळल्याची धक्कादायक घटना शहरात उघडकीस आली आहे. यापैकी एकाला सहा कोटींना तर दुसऱ्याला ७२ लाखांचा चुना लागल्याने खळबळ उडाली आहे. यामधील गंभीर बाब म्हणजे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कोर्टात ऑनलाइन हजर करत असल्याचे भासवण्यात आले.

प्राप्त माहितीनुसार, पहिल्या घटनेत गंगापूर रोड परिसरात राहणाऱ्या एका वृद्धाला व्हिडीओ कॉल आला. त्याच्या सिमकार्डच्या माध्यमातून अश्लील फोटो, व्हिडीओ व्हायरल झाल्याचे त्यास सांगण्यात आले. शिवाय, या मुद्द्यावर त्यास सर्वोच्च न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे धमकावण्यात आल्याने वृद्ध व्यक्ती घाबरली. त्या परिस्थितीचा फायदा उचलून त्याला सहा कोटी रुपये ट्रान्सफर करायला भाग पाडले. दुसऱ्या घटनेत तुमच्या आधारकार्डवरून




क्रेडिट कार्ड इश्यू झाले असून त्या माध्यमातून गैरव्यवहार झाला आहे अशी भीती दाखवत अनिल लालसरे यांना ७२ लाखांना गंडा घालण्यात आला. दंड न भरल्यास सीबीआय पथक अटक करून दिल्लीला नेईल, अशी धमकी या वृद्धास देण्यात आली. त्यामुळे लालसरे यांनी ७२ लाख रुपये आरटीजीएस पद्धतीने जमा करून फसवणूक करवून घेतली. दोन्ही प्रकरणी सायबर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही घटना वेगवेगळ्या व्यक्तींबाबत घडल्या असल्या तरी त्यामधील समान धागा म्हणजे त्यांना देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कोर्टात ऑनलाइन हजर करत असल्याचे भासवण्यात आले आणि भीती दाखवून हे पैसे उकळण्यात आले. घाबरलेल्या या दोन ज्येष्ठ नागरिकांना भामट्यांनी आरटीजीएसच्या माध्यमातून पैसे भरण्यास भाग पाडले.

## कोयता हातात घेऊन रील बनवणारे अटकेत

# नाशकात लासलगाव पोलिसांची मोठी कारवाई

**■लासलगाव। प्रतिनिधी,**

नाशिक जिल्ह्यात कायद्याचे बालेकिल्ले ठरत लासलगाव पोलिसांनी विंचूर परिसरात हातात कोयता घेऊन रील बनवून दहशत माजवणाऱ्या टवाळखोरांचा ताबा घेतला आहे. या कारवाईस नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केले. या कारवाईमुळे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिस सूत्रांनुसार, सामान्य टोंगोरे, खांडू टोंगोरे, विजय बोंबले, दीपक वाघमारे (रा. उमराळे), समीर जाधव (रा. सोनगाव) या टोळक्यांनी विंचूर परिसरात रील बनवत दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला होता.

माहिती मिळताच नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी सुशांत मरकड,



जालिंदर खराटे, सचिन पिंगळ, मंगेश गोसावी आणि लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्यासह पथक ताब्यात घेऊन टवाळखोरांना कारवाईस अधीन केले. याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# पुण्यात कीबोर्ड दुरुस्त करण्याच्या बहाण्याने विद्यार्थिनीच्या डेस्ककडे जाऊन चुकीचा स्पर्श

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शिक्षणाचं माहेर घर मानलं जातं. पण याच शिक्षणाच्या माहेरघरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनी खरंच सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. त्यामागे कारणही तसंच आहे. पुण्यात गुन्हेगारीच्या घटना एकीकडे प्रचंड वाढलेल्या आहेत. काही दिवसांपूर्वी सणासुदीच्या काळात टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळाला होता. त्यानंतर गुंड निलेश घायवळच्या टोळीतील आरोपींनी दोन सर्वसामान्य नागरिकांवर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार समोर आला होता. हेही असे की थोडे आता एका महाविद्यालयात टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पुण्यात अराजकतेचं कृत्य करणाऱ्यांना कोणतही भय राहिलेलं नाही का? असा प्रश्न उपस्थित होतोय.

विशेष म्हणजे शिक्षणाच्या महेरघरात विद्यार्थिनी कॉलेज प्रशासनाकडून सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आहे. एकीकडे वाढती प्रेमी युगलांची संख्या पाहता विविध प्रकार घडतानाच्या घटना समोर येत असतातच. मात्र या शिक्षणाच्या माहेरघरात विद्यार्थ्यांना सुरक्षा देण्याचं काम हे त्या प्रशासनाचा असतो. पण असं असलं तरी कुंपनच शेत खात असल्याचा प्रकार समोर आला आहे. कॉलेजच्या प्रशासनात असलेल्या एका इसमाकडूनच विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.



**नेमकं काय घडलं?**

पुण्यात एका नामांकित महाविद्यालयात प्रॅक्टिकल दरम्यान कॉलेजच्या टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात अंबादास वैद्य असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर भा.दं.सं. ३१७/२०२५ बीएनएस अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा पर्वती पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी वैद्य हा कॉलेजमध्ये टेक्निशियन म्हणून कार्यरत होता. घटनेच्या वेळी कॉम्प्युटर लॅबमध्ये दोन विद्यार्थिनी प्रॅक्टिकल देत होत्या. त्यावेळी आरोपीने कीबोर्ड दुरुस्त करण्याच्या बहाण्याने पीडित विद्यार्थिनीच्या डेस्ककडे जाऊन तिच्या अंगाला अनुचित स्पर्श केला. हा प्रकार पाहून तिची सोबत असलेली मैत्रीण घाबरून क्लासरूमच्या बाहेर धावली आणि मदतीसाठी आरडाओरडा केला. घटनेनंतर पीडित विद्यार्थिनीने हा प्रकार कॉलेज प्रशासनाला तसेच आपल्या पालकांनाही सांगितला. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपीवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतरही कॉलेज प्रशासनाने आरोपीविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. अंबादास वैद्य हा अद्याप कॉलेजमध्ये संगणक विभागात काम पाहत असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाची भूमिका आणि जबाबदारीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com